उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. ०८.०८.२०२४ | अंक नं. १३६ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर

Sintex PVC DOORS
Ideal for Bathroom Toilet & Kitchen
BHINGARWALA ENTERPRISES
Near Swastik Chowk, Station Road. Ahmednagar. Mob 9422224990

डॉ.योगेश सिसोदिया (M.S.ORTHO)
गुडघेदुखी, सांध्याचे आजार,लिगामेंट व स्पोर्टस् इंज्युरी तज्ञ.
संलग्न हॉस्पिटल
संचेती हॉस्पिटल (पुणे) | साईदीप हॉस्पिटल (नगर) : दर शनिवारी
अहमदनगर व्हिजीट : साईदीप हॉस्पिटल
दर शनिवारी : वेळ सकाळी १० ते १२ (अपॉईंटमेंट साठी संपर्क)
9860267116 7387393683

# महापालिकेच्या जन्म-मृत्यू कार्यालयात चालतोयं 'गलथान अन् भोंगळ' कारभार

## एजंटची मुजोरगिरी अन् अधिकारी-कर्मचाऱ्यांची मनमानी सुरुच; नागरिकांची कामांसाठी होतेयं ससेहोलपट

नगर - अहमदनगर महानगरपालिकेचे जन्म-मृत्यू कार्यालय नेहमीच चर्चेत राहिले आहे. या ठिकाणची जुन्या रजिस्टरमधील जीर्ण झालेली महत्वाची दस्तावेज सांभाळून ठेवण्याऐवजी अक्षरशः केराच्या टोपलीत फेकण्यात आल्याचे वृत्तदेखील अनेक वेळा आलेले आहेत. दाखल्यासाठी नगरकरांची व बाहेर गावावरून येणाऱ्या नागरिकांची जन्म-मृत्यू कार्यालयामार्फत कामासाठी जेवढी ससेहोलपट केली जाते तेवढी कोणतेच कार्यालय करत नसेल. या ठिकाणी येणारा प्रत्येक नागरिक वैतागूनच जातो, यात तिळमात्र शंका नाही.



मनपाच्या जन्म-मृत्यू कार्यालयात 'रामभरोसे' कारभार सुरु असून, अधिकाऱ्यांच्या खुर्चीवर बसून फाईलची उचकापाचक करताना एजंट.

कधी नोंदी करणारे कर्मचारी नसतात तर कधी नोंद रजिस्टर सापडत नाही, ही या कार्यलयाची बोंबाबोंब कायमचीच आहे? ना कोणी योग्य माहिती देतो, ना त्यांना माहिती देण्यात रस असतो. त्यांना फक्त आणि फक्त नागरिकांना त्रास देण्यात मोठा आनंद वाटतो की काय? असे चित्र सध्या या कार्यालयात पहावयास मिळत आहे. मनमानी करत या कार्यालयातील नेमणुकीस असलेले कर्मचारी निघून कधी जातो, कधी येतो, हे त्याचे त्यालाच माहिती. मनाला पटेल तसा वागतो. कार्यालयातील दिवे चालू, फॅन चालू, शिपायाच्या भरवशावर हे अधिकारी निघून जातात. त्यांचे फोनदेखील लागत नाहीत. शिपायाला विचारले तर आम्हाला माहीत नाही, सांगून गेले नाही, कधी येणार माहीत नाही, तुम्ही नंतर या, उद्या या, ही साहेबांनी शिकवून दिलेली समर्पक उत्तरे मात्र शिपाई हजरजबाबीपणाने, ते पण अगदी तोऱ्यात देतात.

काल तर या कार्यालयाने आपल्या कामाचा कळसच गाठला आहे. चक्क साहेबाच्या पश्चात साहेबाच्या खुर्चीवर बसून एजंट कार्यालयामधील रजिस्टरची उचाकापाचक करीत मीच कार्यालयाचा बॉस असल्याचे दाखवत होता. महाशयाचे व्हिडीओ चित्रीकरण सुरू केले तर चक्क शिपायाला जोरजोरात बोलत 'हा काय तमाशा लावला, तुम्ही मला माझे काम करू द्या', म्हणत इंग्रजीत बोलायला लागला. आय डोन्ट केअर, ईग्नोर ईग्नोर, रोज यहा एक से बढकर एक तोफ आते है, हमे फर्क नही पडता इन बातो से, असे जोरजोरात र्निलज्जपणाचा कळस गाठत ओरडत होता. शिपायाला महाशयांचे नाव विचारले तर माहिती मिळाली की, ते रोज येतात, रोज रजिस्टर उचकतात पण नाव नाही माहिती त्यांचे. त्यांना प्रश्न विचारला, एखादे महत्वाचे रजिस्टर यामुळे गहाळ झाले तर, या प्रश्नावर मात्र शिपायाने दाखवेली चुप्पी खूप काही सांगून गेली.

काबरा एक्सप्रेस
डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्विस
फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद, नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश इंदौर (राज महौल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र मुंबई (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक, पुणे
राजस्थान उदयपुर, अजमेर, जयपुर दिल्ली मोरी गेट
साऊथ बंगलोर, हैदराबाद, गोवा
For Details
अहमदनगर नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड
7972872112

Titiksha's Fun Villa
SALE ON CURRENT POSITION
SOFTPLAY A Barrel Of Laughs.
TRAMPOLINE A Blast Of Enjoyment
Food Cafe & Birthday Hall A Barrel Of Laughs.
Contact : 94237 85835
Near Royal Hotel, Nagar-Pune Highway in front of Bhansali TVS Showroom, Ahmednagar.

EARTH's Green Library
Greenery for Every Space
Indoor Plants For your Home!
Get a Plant Today!
Indoor Plants | Potted Planters | Premium Planters
Garden Accessories | Garden Furniture | Garden Lightings
Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

गोविंदा ! गोविंदा !! गोविंदा !!!
श्री तिरुपती बालाजी
दर्शनसह श्री पद्मावती, गोविंदराज दर्शनसह कोल्हापूर महालक्ष्मी
प्रतिव्यक्ती
₹ 6501/-
ऑफिस
AMAR PREM Holidays & Multiple services

शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
दररोज
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातुन
नगर येथून स. ७,८,९ व दुपारी २.००
पुणे येथून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निर्जंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
बुकिंग आवश्यक
अमर-प्रेम हॉलिडेज ऑफिस- चितळेरोड,अ.नगर
9657746555/ 9226399555

आकर्षक गिफ्ट आर्टिकल्सवर २५% सुट
आर.एन.आर्ट ॲण्ड क्राफ्ट
गिफ्ट ॲण्ड स्कूल स्टेशनरी | होलसेल ॲण्ड रिटेल
एक्सक्लुसिव्ह गिफ्ट, पर्सनलाईझ्ड गिफ्ट ॲण्ड हॉर्डस
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर-४१४००१
मो : 9325329061/ 9373417113

चतुर्थ स्मृतीदिन



स्व. रोहन राजेंद्र मुनोत
नागपंचमी (स्व.दि.२५/०७/२०२०)
तुझ्या प्रत्येक आठवणींचा ठेवा जपतोय हृदयात ...
आता केवळ वाहते .. अश्रू नयनात !!
तुझ्या स्मृतीदिनी भावपूर्ण श्रध्दांजली..
- दुःखांकित -
राजेंद्र उत्तमचंद मुनोत | सौ.रेखा (मिनताई) राजेंद्र मुनोत
भूषण राजेंद्र मुनोत | रोशन राजेंद्र मुनोत
अंबिकानगर, केडगाव, अहमदनगर

सहावे पुण्यस्मरण



स्व.तात्यासाहेब बाबुराव कोतकर



स्व.लंकाबाई तात्यासाहेब कोतकर

आता सहवास जरी नसला तरी
स्मृती सुगंध देत राहील..
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर
आठवण तुमची येत राहील..

सहाव्या पुण्यस्मरणानिमित्त भावपूर्ण श्रध्दांजली..
: शोकाकूल :
गोधाबाई मधुकर कार्ले
रविंद्र तात्यासाहेब कोतकर | राजेंद्र तात्यासाहेब कोतकर
रमेश तात्यासाहेब कोतकर | प्रतिभा अमोल मांडे
समस्त कोतकर परिवार

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## युनोची प्रशंसा– डिजीटल प्रगतीचा आरसा




युनोच्या ७८ व्या जागतिक अधिवेशनात अध्यक्ष डेनिस फ्रान्सिस यांनी भारतीय डिजीटल क्रांतीची प्रशंसा केली. ते म्हणाले, ''भारताने स्मार्ट फोनचा वापर करून गेल्या ५–७ वर्षात ८० कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढले. खरं तर त्यांना ८० कोटी लोकांना फायदा करून दिला असं म्हणायचं असेल.

स्मार्ट फोनमुळे गरिबी दूर होतेय का गरिबी कमी झाल्याने हाती स्मार्ट फोन आला याचाही विचार करावा लागेल.

तंत्रज्ञानामुळे खेड्यापाड्यातील शेवटचा धटकट्टी लाभान्वित झाला आहे. यामुळेच कोट्यावधी शेतकरी व इतर लाभार्थींना थेट बँक खात्यात पैसे येतात. व्यावसायिकांना बसल्या बसल्या बँकींग व्यवहार करता येत आहेत.

युनोचे कौतुक या अर्थाने महत्त्वाचे आहे की, आज देशात १२० कोटी मोबाईल सबस्क्राईबर्स असून त्यात ७५ कोटी स्मार्ट फोन वापरकर्ते आहेत. शहरात मोबाईलचा वापर २–३ टक्क्यांनी तर ग्रामीण भागात ६% वाढणार आहे.

5-G, सेमी कंडक्टरचे मोठे उत्पादन व आयटी तंत्रज्ञानावर वाढती अर्थव्यवस्था मजबुतीचे मार्ग दाखवत आहे. आता हळूहळू दरडोई उत्पादनाकडे लक्ष दिल्यास खऱ्या अर्थाने आर्थिक महासत्ता बनणे आनंददायी होईल.



# 'डीजे साऊंड सिस्टीम'वर त्वरित 'बंदी' घालावी अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

### कलेच्या नावाखाली कला केंद्र बनलेत डान्सबार; जिल्हाधिकारी व अप्पर पोलीस अधीक्षकांना निवेदन

नगर – डीजेमुळे कलाकेंद्रातील कलावंतांवर उपासमारीची वेळ आली असताना, कलाकेंद्रातील डीजे साऊंड सिस्टीमवर बंदी घालण्याची मागणी अखिल महाराष्ट्र लोकनाट्य सांस्कृतिक कलाकार संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ व अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांची भेट घेऊन निवेदन दिले. तर कलाकेंद्र सांस्कृतिक कलेच्या नावाखाली सर्रास डान्सबार बनले असल्याचा आरोप करण्यात आला आहे.






कला केंद्रातील डीजे साऊंड सिस्टीमवर बंदी घाला अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'उपोषण' करण्याचा इशारा जिल्हाधिकारी व अप्पर पोलीस अधीक्षक यांना निवेनाद्वारे देताना अखिल महाराष्ट्र लोकनाट्य सांस्कृतिक कलाकार संघटनेचे शिष्टमंडळ.

यावेळी आरपीआयचे (आठवले) जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, लावणी सम्राज्ञी सुरेखाताई पुणेकर, कबड्डी असोसिएशनचे जामखेड तालुकाध्यक्ष लक्ष्मण ढेपे, संघटनेचे अध्यक्ष धोंडीराम जावळे, उपाध्यक्ष युवराज गायकवाड, सचिव भीमराव काळोखे, कार्याध्यक्ष शिवाजी जावळेकर, महिला उपाध्यक्षा शोभा लाखे, महिला सचिव अर्चना जावळेकर, महिला कार्याध्यक्षा सविता अंधारे, विठ्ठल जावळेकर, विकास जावळेकर, महादेव कुडाळकर, कृष्णा मोहळकर, राजू कुडाळकर (आर.के.), प्रकाश काळे, ज्ञानेश्वर मोहरकर, रणजीत पाटणकर, विनोद काळे आदींसह जिल्ह्यातील व जामखेड तालुक्यातील कलाकार उपस्थित होते.

अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड या ठिकाणी सुमारे ९ कलाकेंद्र असून, सदरचे कलाकेंद्र सांस्कृतिक कलेच्या नावाखाली सरासर डान्सबार बनले आहेत. कलाकेंद्रात लावण्यात आलेल्या डीजे सिस्टीमने कलाकारांच्या हाताला काम राहिले नाही. परिणामी त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. पेटी, ढोलकी, तबला वादक, गायक आदी कलाकार आपल्या कामाला मुकले आहे. कलाकेंद्रात महाराष्ट्राची संस्कृती जपणारी मराठमोळी लावणी व लोकनाट्य असायचे, मात्र लोकनाट्य, संस्कृती कला केंद्राच्या नावाखाली सरासर डान्सबार सुरू झाले असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

यापूर्वी दोन वेळा पोलीस अधीक्षक कार्यालयात निवेदन देण्यात आले असून, निवेदनाची कसल्याही प्रकारे दखल घेण्यात आलेली नाही. हा प्रकार न थांबल्यास सर्व कलाकारांनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा संघटनेच्या वतीने दिला आहे.

शेंडी जवळील एका हॉटेलमध्ये अखिल महाराष्ट्र लोकनाट्य सांस्कृतिक कलाकार संघटनेचा मेळावा पार पडला. लावणी सम्राज्ञी सुरेखाताई पुणेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या या मेळाव्यात कलाकेंद्रात डीजे बंदीचा ठराव घेण्यात आला. तर यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करुन वेळप्रसंगी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

कलावंतांना जगण्यासाठी कलाकेंद्र हा मोठा आधार होता. या ठिकाणी डीजेचे अतिक्रमण झाल्याने त्यांच्यावर उपासमारी सुरु आहे. कलाकेंद्राच्या नावाखाली सुरु झालेले डान्सबार त्वरीत बंद करण्यासाठी जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी. अन्यथा आरपीआयच्या माध्यमातून देखील आंदोलन छेडले जाणार असल्याचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रात लावणी व लोककला कलाकेंद्रामुळे जिवंत आहेत. मात्र सध्या डिजेच्या युगात कलाकेंद्राच्या नावाखाली अनाधिकृत डान्सबार सुरु झालेले आहेत. यामुळे कलाकारांवर एकप्रकारे अन्याय करुन त्यांचा रोजगार हिरावून घेतला जात आहे. कलाकेंद्रात फक्त कलांचे सादरीकरण व्हावे, हुल्लडपणा करणाऱ्या कलाकेंद्रातील डान्सबार बंद करून महाराष्ट्राची संस्कृतीला काळीमा फासण्याचे प्रकार थांबविण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, असे अखिल महाराष्ट्र लोकनाट्य सांस्कृतिक कलाकार संघटनेचे अध्यक्ष धोंडीराम जावळे यांनी म्हटले आहे.

## झेंडीगेट परिसरात २ ठिकाणी पकडले ६८ हजाराचे गोमांस

नगर – कोतवाली पोलिसांनी झेंडीगेट परिसरात दोन ठिकाणी छापेमारी करून ६८ हजार रूपये किमतीचे गोमांस जप्त केले. या प्रकरणी दोघांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वसीम अस्लम तांबोळी (वय २४, रा. मंगलगेट, कोठला) हा झेंडीगेट परिसरात कारी मस्जिदच्या शेजारी पत्र्याच्या शेडमध्ये गोमांस विक्री करत असताना पकडला. त्याच्या ताब्यातून ४० किलो गोमांस, एक चाकू व एक वजन काटा असा आठ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार अतुल काजळे यांच्या फिर्यादीवरून त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बेपारी मोहल्ला परिसरातील एका पत्र्याच्या शेडमध्ये गोमांस विक्री करताना इरफान फारूक कुरेशी (वय ३६, रा. बेपारी मोहल्ला) याला पकडले. त्याच्याकडे ६० हजार रूपये किमतीचे गोमांस, एक चाकू व एक वजन काटा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार सुरज कदम यांच्या फिर्यादीवरून त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाली पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने ही कारवाई केली आहे.

## ९ ऑगस्ट क्रांतिदिनी किल्ल्यात 'हेरिटेज वॉक'

नगर – ऑगस्ट क्रांतिदिनाचं औचित्य साधत ९ ऑगस्टला नगरच्या भुईकोट किल्ल्यात हेरिटेज वॉक आयोजित करण्यात आला आहे. सकाळी साडेआठ वाजता किल्ल्याच्या प्रवेशद्वारासमोरील दोन तोफांजवळ जमून नंतर तटबंदीवरून भ्रमंती सुरू होईल. ज्या फत्तेबुरूजावर १५ ऑगस्ट १९४७ रोजी पहिल्यांदा भारताचा राष्ट्रध्वज फडकला, तिथं देशभक्तीपर गाणी म्हणत 'नेता कक्षा'त हेरिटेज वॉकचा समारोप होईल. हा उपक्रम सर्वांसाठी खुला आहे.



# चक्क पोलिस महिलेच्याच गळ्यातील सोन्याची चेन हिसकावली

### मात्र तिने मैत्रिणींसह पाठलाग करून दोघा चोरट्यांना अखेर पकडले

नगर – नगर शहरासह उपनगरात गेल्या दिवसांपासून चेन स्नॅचिंग करणाऱ्या चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. या चोरट्यांनी मंगळवारी (दि.६) रात्री तर बालिकाश्रम रस्त्यावर एका पोलीस महिलेच्याच गळ्यातील सोन्याची चेन ओरबाडून नेली. मात्र या पोलिस महिलेने आणि तिच्या २ मैत्रिणींनी पाठलाग करून दोघा चोरट्यांना पकडले आहे.

मोहीनी ज्योतीराम कांबळे (रा. पोलीस मुख्यालय, नगर) असे त्या महिला पोलीस अंमलदाराचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनोद ऊर्फ जॉनी ऊर्फ वीर जिजाबा ऊर्फ ओवाळ्या भोसले (वय १९) व विशाल जिजाबा ऊर्फ ओवळ्या भोसले (वय १९, दोघे रा. चिखली ता. आष्टी, जि. बीड) अशी पकडलेल्या चोरट्यांची नावे आहेत.

फिर्यादी कांबळे या त्यांची मैत्रिण निकीता बनकर व आश्विनी थोरात यांच्यासह किराणा खरेदीसाठी मंगळवारी रात्री पायी जात होत्या. त्या रात्री ७.५० वाजेच्या सुमारास निलक्रांती चौकात आल्या असता दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी फिर्यादीच्या गळ्यातील ओढणीसोबत सोन्याची चेन ओढली व बालिकाश्रम रस्त्याने धूम ठोकली. फिर्यादी यांच्या सदरचा प्रकार लक्षात येताच त्यांनी मैत्रिणीसह त्या चोरट्यांचा पाठलाग सुरु केला. काही अंतरावरच रहादरीमुळे चोरट्यांचा वेग मंदावला त्यावेळी त्यांना या तिघींनी पकडले.

सदरचा प्रकार पाहून परिसरातील लोकांनी घटनास्थळी गर्दी केली. तोफखाना पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पकडलेल्या दोघांच्या ताब्यातून फिर्यादी यांनी त्यांची एक तोळ्याची चेन ताब्यात घेतली. पोलिसांनी त्या दोघांना ताब्यात घेतले असून त्यांना अटक केली आहे.

या दोघांना न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना ९ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन रणशेवरे करत आहेत.

## गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

नगर – राहत्या घरात अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन तरुणाने आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील दरेवाडी येथील राधाकृष्ण कॉलनीमध्ये बुधवारी (दि.७) सकाळी घडली आहे. किरण दत्तात्रय डहाणे (वय २८) असे मयत तरुणाचे नाव आहे. किरण याने राहत्या घरात गळफास घेतल्याचे त्याच्या कुटुंबियांच्या निदर्शनास आल्यावर त्याचे नातेवाईक संजय डहाणे यांनी सकाळी ९.१५ च्या सुमारास त्याला बेशुद्धावस्थेत उपचारासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. बोठे यांनी किरण याची तपासणी केली असता तो उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषीत केले. तशी माहिती त्यांनी दवाखाना ड्युटीवर असलेले तोफखाना पोलिस स्टेशन चे पोलीस अंमलदार जी.जी. गोरडे यांना दिली. त्यांनी दिलेल्या खबरीवरून भिंगार कम्प पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस पो.हे.कॉ. महेश विधाते हे करत आहेत.

## पवन चिंतामणी याचे अल्प आजाराने निधन

नगर – सिव्हील हडको येथील रहिवासी पवन जगन्नाथ चिंतामणी (वय २१) याचे ८ ऑगस्ट रोजी अल्पश: आजाराने निधन झाले. त्याच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्याच्या पश्चात आई, वडील, २ चुलते, चुलत्या, भाऊ, बहिण असा परिवार आहे. सोमनाथ चिंतामणी यांचा तो पुतण्या होत.

## समतेच्या पाईक हजराबाई सय्यद यांचे निधन

नगर – आष्टी तालुक्यातील हातोळण (औरंगपूर) येथील हजराबाई चाँद सय्यद (वय ९५) यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हजराबाई यांनी आयुष्यभर देवी अंबाबाईचे गाणे गात भक्ती केली. तर, पिराच्या दर्गामध्ये दिवाबत्ती करून पूजा केली. हातवळण परिसरात आराध्याचा मेळा हजराबाई यांच्याशिवाय पूर्ण होत नव्हता.



देवी अंबाबाईचा छबिना व पिराचा उरूसामध्ये त्या हिरिरीने सहभागी होत. पिरसाहेबाची दिवाबत्ती करणे आणि अंबाबाईची गाणे म्हणणे यात मला एकाच देव दिसतो, असे त्या सांगत. आजमितीला त्यांचे पुत्र महेबूब सय्यद हलगी वाजवून अंबाबाईचे गाणे गात आहेत. तर, पीर साहेबांची दिवाबत्ती करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करावी

### शिवसेना आणि महावितरणची बैठक; वीजपुरवठा सुरळीत व समस्यांबाबत सकारात्मक चर्चा

नगर – मिरवणुक मार्गावरील विद्युत वाहिनीसाठी सात कोटी रुपयांचे काम झाले. ते सर्व काम निकृष्ट दर्जाचे झाले आहेत. झालेल्या कामाची महावितरणने प्रत्यक्ष पाहणी करुन ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी केली. तसेच आगरकर मळा, गणेशनगर शंकरबाबा मठ, केडगांव, शाहूनगर, एकनाथनगर आदी ठिकाणी नवीन डिपी बसविण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच भिंगार शहर व केडगांव अंबिकानगरमध्ये सुद्धा सातत्याने विद्युत पुरवठा खंडित होतो. त्यावरही उपाययोजना करण्यात याव्यात. नागरीकांना वीज बिल वेळेवर देण्यात यावी आदी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख संभाजी कदम यांनी महावितरणसमोर मांडल्या आहेत.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने महावितरण कार्यलयाच्या गलथान कारभाराच्या विरोधात नगर शहर शिवसेनेच्यावतीने काही दिवसापूर्वी आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर महावितरणच्यावतीने शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने महावितरण कार्यलयाच्या गलथन कारभाराच्या विरोधात काही दिवसापूर्वी आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर महावितरणच्यावतीने विविध समस्यांचा अभ्यास करुन शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी विधान सभा संपर्क प्रमुख विलास घोगरे, शहरप्रमुख संभाजी कदम, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, योगिराज गाडे, सचिन शिंदे, संतोष गेनप्पा, अमोल येवले, परेश लोखंडे, संग्राम कोतकर, हर्षवर्धन कोतकर, डॉ.श्रीकांत चेमटे, गौरव ढोणे, जेम्स आल्हाट, प्रताप गडाख, मुन्ना भिंगारदिवे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी महावितरणचे अधिक्षक अभियंता म्हणाले कि, मागील आंदोलनाच्या वेळी तुम्ही ज्या समस्या, अडचणी सांगितल्या होत्या. त्याबाबत आमच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जावुन पाहणी केली आहे. व ज्या ज्या काही समस्या आहेत त्या लवकरच दुर केल्या जातील.

यावेळी भगवान फुलसौंदर म्हणाले कि, सध्या सोलर सिस्टीम घेण्याकडे नागरीकांचा कल दिसून येतो, परंतू महावितरणकडून त्याबाबत कुठलेही प्रकारचे सहकार्य केले जात नसल्याची खंत व्यक्त केली.

बाळासाहेब बोराटे म्हणाले कि, महावितरणचे कर्मचारी एखाद्या भागामध्ये डिपी बसवत असतांना स्थानिक नागरीक, मनपा प्रशासन, नगरसेवक यांना विश्वासात न घेता काम करुन मोकळे होतात. बऱ्याच ठिकाणी विजेचे खांब हे रस्त्याच्या मध्यभागी आहेत. त्यामुळे वाहतूकीसही अडथळा निर्माण होतो.

## एटीएम कार्डचा गैरवापर करून महिलेच्या बँक खात्यातून काढले ५८ हजार २०० रूपये

नगर – एटीएम मशीनमध्ये पैसे काढण्यासाठी गेलेल्या वृध्द महिलेच्या एटीएम कार्डचा गैरवापर करून अनोळखी ३ व्यक्तींनी त्या महिलेच्या बँक खात्यातून ५८ हजार २०० रूपये काढून घेतल्याची घटना केडगाव उपनगरात असलेल्या ॲक्सीस बँकेच्या एटीएम मशीनमध्ये मंगळवारी (दि.६) सायंकाळी ६.१५ च्या सुमारास घडली.

या बाबत ज्योती वाल्मिक राठोड (वय ६१, रा. पाटील कॉलनी, अंबिकानगर, केडगाव) यांनी बुधवारी (दि.७) रात्री कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्याकडे सेन्ट्रल बँकेचे एटीएम कार्ड असून त्या मंगळवारी सायंकाळी केडगाव मधील ॲक्सीस बँकेच्या एटीएम मशीनमध्ये पैसे काढण्यासाठी गेल्या होत्या. तेथे त्यांना ३ अनोळखी व्यक्ती भेटले. त्यांनी राठोड यांच्या सोबत ओळख वाढवून विश्वास संपादन केला. त्यांच्यासोबत गोड बोलून पैसे काढून देतो असे म्हणत त्यांचे एटीएम कार्ड घेतले आणि त्यांच्या जवळील दुसरे कार्ड त्या त्यांच्या हातात देवून तेथून निघून गेले.

त्यानंतर त्या कार्डचा वापर करून राठोड यांच्या बँक खात्यातून ५८ हजार २०० रूपये काढून घेतले. राठोड यांना सदरचा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाणे गाठून माहिती दिली. पोलिसांनी अनोळखी व्यक्तीविरूध्द बीएनएस कलम ३१८ (४), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## आर्मर्ड कॉर्प सेंटर चौक (बीड/सोलापूर) कडे वळणाऱ्या चौकातील हायमास्ट दिवा चालू करा

शहरातून बाहेर जातांना चाँदणी चौकापासून बीड व सोलापूरकडे वळणाऱ्या आर्मर्ड कॉर्प सेंटर चौकात हायमास्ट दिवा गेल्या अनेक महिन्यांपासून बंद आहे. त्यामुळे वाहनधारकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. हायमास्ट बंद अवस्थेत असल्याने नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. तरी संरक्षण मंत्रालयाच्या एम ई एस प्रशासनाने त्वरित हायमास्ट दिवा चालू करावा अशी मागणी नागरिक करत आहेत. (छाया – महावीर पोखरणा)



# गृहिणी

## आरोग्य

### दह्याच्या सेवनाने होते वजन कमी

हल्ली अनेक जण वाढत्या वजनाच्या त्रासाने ग्रासलेले असतात. दह्यातील कॅल्शिअम शरीरातील कोर्टिसोलची मात्रा वाढू देत नाही. शरीरातील कोर्टिसोल हार्मोनल इन्बॅलन्स, जाडेपणा आणि कॉलेस्ट्रॉलच्या वाढीचे कारण आहे.

## पाककला

### कोकोबाईट

**साहित्य** : एक वाटी सोयाबीन पीठ, एक वाटी दाण्याचे कूड, एक वाटी पिठीसाखर, एक वाटी डेसिकेटेड खोबरं, पाऊण वाटी तूप, एक टी स्पून वेलची पूड, पाच चमचा बेकिंग पाडवर, काजू.

**कृती** : सोयाबीन पीठास दाण्याचे कूट, पिठीसाखर, डेसिकेटेड खोबरं, वेलचीपूड, बेकिंग पावडर, काजूचे तुकडे एकत्र करून त्यामध्ये तूप पातळ करून घालावे व गोळा भिजवावे.

छोटा छोटा गोळा घेऊन त्याचे चपटे गोळे करून, वरून एक एक काजूचा तुकडा लावून ट्रेमध्ये ठेवावे. बेक करावे. नंतर दहा मिनिटे १५० सें. वर बेक करावे. कुरकुरीत कोकोबाईट तयार!

## वास्तू

### पाण्याचा साठा कोठे असावा

कुठे बोअरिंग करावे, हँडपंप कुठे बसवायचा, अंडरग्राऊंड टाकी बांधायची असेल तर योग्य जागा म्हणजे उत्तर वा पूर्व दिशा निवडावी. याउलट ओव्हरहेड टाकी मात्र दक्षिण वा पश्चिम बाजूसच असावी. बांधकाम करताना टाकी लावायची असेल तर टाकीची शास्त्रोक्त पूजा-अर्चा करावी.

## सल्ला

दात येताना बाळ रडत असेल तर २ चमचे जाड बडीशेप कपभर पाण्यात उकळा व ती गाळून ते पाणी एक-एक चमचा दिवसातून ४ वेळा पाजा. बाळाला दात येताना त्रास होणार नाही.

## सौंदर्य

बाभळीच्या आतील सालीच्या काढ्याच्या गुळण्या केल्याने दात मजबूत होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ९ ऑगस्ट २०२४

**नागपंचमी, ऋक् - शुक्ल यजुः हिरण्यकेशी उपाकर्म, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष हस्त २६|४५, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : अवाजवी खर्च टाळाल. आवश्यक तेवढेच नेमके बोलाल. कलह तणाव वाढवू शकतो.

**वृषभ** : सोयी सवलतींसाठी खर्च वाढेल. हाताखालील व्यक्तींना मदत करावी लागेल.

**मिथुन** : बेकायदा कामे अंगलट येतील. मूलभूत गरजांवर काम कराल. भांडण होईल.

**कर्क** : कामात एकरूपता हवी. कामाच्या ठिकाणचे वरिष्ठांचे दडपण आणि घरातील कलह तुमच्यावरील तणाव वाढवू शकतो.

**सिंह** : परगावी कार्यालय काढाल. नैराश्य दूर जाईल. मागील उधारी व उसनवारी वसुल होईल.

**कन्या** : तांत्रिक कामे त्वरित करान. खर्च वाढेल.

**तूळ** : परस्पर वाद घालाल. जुने मित्र-मैत्रिणी भेटतील.

**वृश्चिक** : करार वा हमीस चांगला. अंदाज चुकेल. वाहन अपघात होईल.

**धनु** : भावनिक चुका कराल. तुमचे आवडते छंद जोपासाल.

**मकर** : वेळ पाळावीच लागेल. चर्चा टाळा. तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे

**कुंभ** : भावनिक द्वंद्वे टाळावीत. भाऊबंद डोके वर काढतील. शारीरिक आरोग्य संतुलित राखा.

**मीन** : घोळ निस्तरतील. भावनिक आनंद मिळेल. प्रवास टाळाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## हसा आणि शतायुषी व्हा!

''विक्रीस निघालेला भुताचा वाडा बघून तर घेऊ''
असा विचार करून तो वाडा बघायला खुशालराव गेले. दारावरची बेल वाजल्यावर, दोन व्यक्ती दरवाजात आल्या. खुशालरावांनी त्यांना विचारलं, ''काय हो, या वाड्यात भुतं राहतात असं लोक बोलतात, ते खरं आहे का?''
**एक व्यक्ती** : ''काही कल्पना नाही बुवा!''तुम्ही असं करा. शेजारी चौकशी करा, कारण आम्हाला मरून दहा वर्षे होऊन गेली.

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



माझे बक्षीस जर भारदस्त वाटत असेल तर
माझे नाव त्यातून काढून टाक माझे गाणे तेवढे ठेव
**मूळ इंग्रजी कविता - रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## फिल्मीचक्कर क्र. ११५० सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ४ | | ५ |
| | ■ | ६ | | ■ | | ■ | |
| | ■ | | ■ | ७ | | | ■ |
| ८ | ९ | ■ | १० | ■ | | ■ | ११ |
| १२ | | १३ | | ■ | १४ | | |
| | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | ■ |
| १५ | १६ | ■ | १७ | ■ | १८ | १९ | |
| ■ | २० | | | | | | ■ |

**आडवे शब्द :-** १) अनिल कपूर, श्रीदेवी, जॅकी श्रॉफ, अनुपम खेर यांचा एक चित्रपट ६) अब आयेगा ++ (चित्रपटाचे नाव) ७) राजेंद्रकुमार, सायराबानो यांचा एक चित्रपट ८) ++ बलराम (चित्रपटाचे नाव) १२) संजीवकुमार, लीना चंदावरकर यांचा एक चित्रपट १४) सुलोचना, डॉ. काशीनाथ घाणेकर, इंदुमती पैंगणकर, शरद तळवलकर यांचा एक चित्रपट १५) जॉनी मेरा ++ (चित्रपटाचे नाव) १८) +++ शेषाद्री (अभिनेत्री) २०) राजेश खन्ना, रेखा, अमिताभ बच्चन यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** १) ++ ++ +++ प्यार मेरा दीवाना भूल कोई हमसे ना हो जाये (गाणे) २) धर्मेंद्र, रेखा यांचा एक चित्रपट ३) ++ हिन्दुस्तानी (चित्रपटाचे नाव) ४) ++ +++ शोर (चित्रपटाचे नाव) ५) ++ घटा (चित्रपटाचे नाव) ९) मेरे ++ की गंगा और तेरे मन की जमुना का बोल राधा बोल (गाणे) १०) एक फूल दो ++ (चित्रपटाचे नाव) ११) ++ कपडा और मकान (चित्रपटाचे नाव) १३) चल ++ चल मेरे साथी ओ मेरे हाथी चल ले चल खटारा खींच के (गाणे) १६) ++ फायटर जॉनी (चित्रपटाचे नाव) १७) राजा और ++ (चित्रपटाचे नाव) १८) के पग घुंगरू ++ नाची थी (गाणे) १९) मेरा ++ जोकर (चित्रपटाचे नाव)

# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : दुर्जन मनुष्य जेव्हा संत होण्याचे ढोंग करतो तेव्हा तो अधिक दुष्ट बनतो. - **बेकन.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### त्वचारोपण म्हणजे काय?

हृदयारोपण, मूत्रपिंडरोपण असे शब्द तुम्ही ऐकले असतील. रोगग्रस्त हृदय, मूत्रपिंड यांच्या जागी पर्यायी हृदय वा मूत्रपिंड बसवणे असा त्याचा अर्थ होय. त्याचप्रमाणे त्वचारोपण याचा अर्थ त्वचेचे रोपण करणे किंवा त्वचा बसवणे असा होतो. आपल्या ज्ञानेंद्रियांपैकी एक इंद्रिय म्हणजे त्वचा होय. त्वचेची अनेक कार्ये आहेत. स्पर्शज्ञान हे महत्त्वाचे कार्य आहे. त्वचेखाली असलेल्या चरबीमुळे त्वचा आपले थंडीपासून रक्षण करते. त्वचेत असलेल्या घामाच्या ग्रंथीमुळे तापमान नियंत्रण, तसेच शरीरातील पाणी व क्षार यांचे नियंत्रण होण्यास मदत होते. त्वचेमुळे सर्व इंद्रियांचे, स्नायूंचे रक्षण होते. त्वचेमुळे थंडी, उष्णता, वेदना यांचे आपल्याला ज्ञान होते व आपण स्वतःचे रक्षण करू शकतो. त्वचा नसेल तर काय होईल? भाजलेल्या व्यक्तीत याचे उत्तर आपल्याला सापडते. भाजलेल्या व्यक्तीमध्ये त्वचा नष्ट होते. त्यामुळे पर्यावरणातील जीवजंतू सरळ शरीरात प्रवेश करतात. बऱ्याचदा भाजलेल्या रुग्ण अशा जंतूसंसर्गांमुळेच मृत्युमुखी पडतो. असे हे त्वचेचे महत्त्व. काही रुग्णांमध्ये त्वचारोपण करावे लागते. यासाठी रुग्णाची स्वतःचीच (शरीराच्या इतर भागाची) किंवा दुसऱ्या व्यक्तीची त्वचा वापरली जातो. त्वचेमध्ये बाह्यत्वचा व अंतःत्वचा असे दोन थर असतात. त्वचारोपणाच्या एका पद्धतीत दात्याच्या बाह्यत्वचेचा सर्व भाग व त्यालगतचा अंतःत्वचेचा भाग घेतला जातो व तो रुग्णाच्या शरीरावर आवश्यक तेथे बसवला जातो. दुसऱ्या पद्धतीत दात्याच्या संपूर्ण त्वचेचा (बाह्य व अंतःत्वचा) तुकडा कापून घेऊन तो रुग्णासाठी वापरला जातो. या पद्धतीत या दान केलेल्या त्वचेला ताबडतोब रक्तपुरवठा सुरू होणे गरजेचे असते. काही वेळा रुग्णाच्या शरीराच्या एका भागावरील त्वचा (तिचा रक्तपुरवठा सुखरूप ठेवून) दुसऱ्या भागावर बसवली जाते. कालांतराने तेथील रक्तपुरवठा सुरु झाल्यानंतर या त्वचेचा आधीच्या भागाशी असलेला संपर्क कापून टाकला जातो. असे हे त्वचारोपण. प्लॅस्टीक सर्जरीमध्ये याचे फारच महत्त्व आहे. इतरही अनेक गंभीर अपघातात, भाजलेल्या रुग्णात त्वचारोपणाने व्यक्तीचे प्राण वाचवता येतात. तसेच शारीरिक विद्रूपताही टाळता येते.

## गाढव आणि लांडगा

एका रानात खूप प्राणी राहत होते. त्यांत एक चांगले धष्टपुष्ट गाढव आणि एक लांडगाही राहत होता. एकदा लांडग्याने त्या धष्टपुष्ट गाढवाला चरताना पाहिले. याचे थोडे जरी मास खायला मिळाले, तर काय मजा येईल, असा विचार लांडग्याच्या मनात येताच त्याच्या तोंडाला पाणी सुटले. या गाढवाला कसे फसवावे, याचा विचार त्याच्या मनात आला आणि त्याने एक बेत रचला.

लांडग्याने वैद्याचे सोंग घेतले आणि सर्व प्राण्यांना कळविले की, ''मी अनेक देशांत हिंडून-फिरून सर्व औषधांची माहिती घेतली आहे. माझ्याकडे सर्व रोगांवर रामबाण औषधी वनस्पती आहेत. प्राण्यांचे सर्व रोग मी बरे करू शकतो.''

लांडग्याचा आपल्यावर डोळा आहे, फसवून माझे मांस त्याला खायचे आहे; म्हणूनच त्याने हे ढोंग रचले आहे, हे गाढवाने ओळखले आणि त्या लांडग्याला चांगली अद्दल घडवावी, असा विचार गाढवाच्या मनात आला.

मग भोळेपणाचा आव आणून गाढव खोटेच लंगडत-लंगडत लांडग्यापुढे गेले आणि म्हणाले, ''वैद्यमहाराज, माझ्या पायात काटा घुसल्याने मी अगदी वैतागून गेलो आहे. कृपा करून त्यावर काही उपाय करा.''

यावर लांडगा साळसूदपणा दाखवित म्हणाला, ''अरे मित्रा, असा माझ्याजवळ ये; म्हणजे मला तुझा पाय चांगला पाहता येईल.'' लांडगा असे म्हणताच गाढव त्याच्याजवळ गेले आणि आपल्या मागच्या पायाची अशी सणसणीत लाथ लांडग्याच्या तोंडावर हाणली की, ह्या तडाख्याने त्याचे तोंड फुटून तो मोठमोठ्याने आकांत करू लागला. असे पाहताच गाढवाने धूम ठोकून तेथून पलायन केले; आणि जाता-जाता म्हणाले, ''मला फसवतोस काय लबाडा! आता बस कोकलत.''

**तात्पर्य** : आपल्यापेक्षा सवाई कोणी तरी भेटतोच.

## जीवन चक्र



यदि हम उस प्रेम को इतना फैला लें कि समस्त सृष्टि से हमें प्यार हो जाए, तो हम स्वयं अंदाज़ा लगा सकते हैं कि तब हमारे हृदय में कितना अधिक प्रेम होगा। ऐसा प्रेम पवित्र व आध्यात्मिक होता है। ऐसा प्रेम ही प्रभु को अपनी सृष्टि से होता है। प्रेम दिव्य है, प्रेम ईश्वरीय है, प्रेम एक आध्यात्मिक गुण है।

दिव्य प्रेम में आत्मा को अपने कर्ता, परमात्मा में पुनः विलीन होने की लालसा होती है। जब प्रभु ने अपने अंशों (यानी आत्माओं) को अपने आपसे अलग किया और उन्हें संसार में भेज दिया तो उस वक्त जुदाई का दुःख था। यह दुःख माता-पिता को होने वाले उस दुःख में के जैसा है, जो अपने बच्चे से बिछुड़ते समय उन्हें होता है। माता-पिता और बच्च के बीच प्रेम का बन्धन इतना गहरा होता है कि जब बच्चा जुदा होता है, तो माता-पिता अपने दिल में ज़बरदस्त झटका या तड़प महसूस करत हैं। जब बच्चा बहुत दूर चला जाता है, तो मोह और प्रेम की निरन्तर कसक माता-पिता अपने दिल में महसूस करते हैं। यह अचल प्रेम है. बच्चे काल दिन-रात माता-पिता के साथ रहता है। वे बच्चे के बारे में सोचते रहते ने के लिए प्रेम की भावना रखते हैं व उसे याद करते रहते हैं। प्रेम निरन्तर खिंचाव भी रहता है, जो बच्चे को चुम्बक की तरह पिता की ओर वापिस खींचता है। जब तक बच्चा दौड़ कर उनकी में नहीं आ जाता, माता या पिता को चैन नहीं मिलता। इसी तरह पभ सब आत्माओं का पिता है। जब वे आत्माएँ एक या दूसरे जीव के रूप में संसार में होती हैं, तो वह प्रत्येक आत्मा को याद करता है, प्रत्येक आत्मा से प्रेम करता है, हर एक का ध्यान रखता है (उसका ध्यान प्रत्येक आत्मा पर होता है)। इस बात का अंदाज़ा लगाना कठिन नहीं है क्योंकि हम जानते हैं कि कुछ माता-पिता के एक से अधिक बच्चे होते हैं और वे प्रत्येक बच्चे से प्रेम करते हैं। प्रभु सदा इन्तज़ार कर रहा है कि आत्मा अपना चेहरा उसकी तरफ करे और उसके पास लौट आए। वह जानता है कि आत्माएँ इस संसार के अनगिनत आकर्षणों में खो गई हैं। वह चाहता है कि वे उसे (प्रभु को) याद करें और अपने घर वापिस आ जाएँ। जीवन में समय-समय पर प्रत्येक आत्मा एक प्रकार की उदासी का, एक अपूर्णता का अनुभव करती है। जब घर वापिस जाने का यह आन्तरिक खिंचाव बहुत तीव्र हो जाता है, तो हम उस अवस्था में पहुँच जाते हैं, जिसे आध्यात्मिक जागृति कहा जाता है।

जीवन में ऐसे अवसर आते हैं, जब हमारे अन्दर एक धीमी सी आवाज़ हमें बताती है कि इस भौतिक जगत में हम जो कुछ भी जानते। ' हैं, उससे आगे भी कुछ और है। यह ध्वनि किसी दुर्घटना से, परिवार में किसी की मौत से या किसी भारी नुकसान से जागृत हो सकती है। हम अचानक ही सोचना शुरू कर देते हैं कि जीवन का अभिप्राय क्या है, हम कौन है और मौत के बाद हमारे साथ क्या होता है। यह परेशान करती धीमी आवाज़ समय के साथ तेज़ हो जाती है। हमारे अन्दर इन प्रश्नों की खोज करने के लिए एक खिंचाव पैदा हो जाता है। हमारे दिलों में यह खिंचाव खुद प्रभु पैदा करता है, ताकि वह हमें अपनी ओ. सकें। जिस क्षण उसे अवसर मिलता है, जिस क्षण वह देखता है। इस संसार और इसके आकर्षणों की वास्तविकता के बारे में कछ। है, वह उस समय का लाभ उठाता है। वह हमारे भीतर वह बीज डालन है, जो जीवन के रहस्यों को हल करने के लिए हमें प्रेरित करता उसका प्रेम हमारे भीतर कार्य करना शुरू कर देता है और हममें प्रभा जानने की इच्छा जागृत हो जाती है। यह हमारे लिए एक महान दिवस होता है, जब हम अपने सच्चे पिता को जानने की अपनी आत्मा की पुकार को सुनने लगते हैं।

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

**प्रेम और कामवासना -**

मनुष्य जीवन की इकाई कोशिका है। अच्छा या बुरा बल कोशिका में ही पैदा होता है। कोशिका में गुण सूत्र के २३ जोड़े होते हैं। प्रत्येक जोड़े में एक गुणसूत्र पिता का और गणसत्र माता का होता है। २२ जोड़े ऐसे होते हैं जिनमें काम वासना सम्बन्धी कोई गण नहीं होता। २३वां जोड़ा जो होता है उसमें काम-वासना का बीज होता है। २२ जोड़े जो हैं उनसे सस बल पैदा होता है जिससे हम कार्य करते हैं। रोटी बनाते हैं, कपड़े धोते हैं। बोझ उठाते हैं या और कोई भी दिमाग का काम करते हैं। २३वां जोड़ा हमारे में विपरीत लिंग की तरफ आकर्षण पैदा करता है। जब भाई-बहनों की तरफ देखते हैं तो जो २३वां जोड़ा है जो उसे पिता से मिला होता है उसमें सकारात्मक चुम्बकीय बल पैदा होता है जो बहनों को अपनी तरफ आकर्षित करने लगता है। करोड़ो कोशिकाओं में एक-एक सूत्र यह बल पैदा करता है जोकि मिलकर बहत शक्तिशाली चुम्बक बन जाता है। जिसके परिणामस्वरूप मनुष्य दिन-रात इसी खिंचाव से

इसी तरह जब बहनें भाईयों को देखती हैं तो जो २३वां जोड़ा होता है जो सूत्र उन्हें माता से मिला होता है उसमें नकारात्मक चुम्बकीय बल उत्पन्न होता है जो भाईयों को अपनी तरफ खींचता है। करोड़ो कोशिकाओं का बल मिलकर बहुत शक्तिशाली चुम्बक बन जाता है। जिसके कारण बहनें दिन-रात इसी खिंचाव से पीड़ित रहती हैं। यही काम वासना व अपवित्रता का कारण बनता है।

कई व्यक्तियों में यह २३वां जोडा होता ही नहीं। उसके अंग तो विकसित होते हैं परंतु उनमें वासना उत्पन्न नहीं होती। इसलिये उनका मन कहीं नहीं भटकता। ऐसे मनुष्य महामानव होते हैं जो संसार में अद्भुत कार्य करते हैं। कई मनुष्यों में २२ जोड़े के बजाय २१ जोड़े ही होते हैं जो कार्य के लिये बल पैदा करते हैं। उनमें २२वां या २३वां जोड़ा आकर्षण (वासना) का कार्य करता है। ऐसे लोग लम्पट, महाक्रोधी, महा कमीना, महा अहंकारी होते हैं। वे जहाँ भी जायेंगे आफतें ही खड़ी करेंगे।

जब बच्चे का जन्म होता है तो पवित्रता बच्चे के माथे में होती है। इसलिये बच्चे का ललाट योगियों की तरह चमकता है। हर व्यक्ति को यह रुप प्यारा लगता है। बच्चा सबका मन मोह लेता है। पहले आठ वर्ष तक जब से बच्चा शब्द बोलने लगता है वस्तुओं एवं लोगों को पहचानने लगता है पवित्रता उसकी आँखों में रहती है। जिसको भी बच्चा देखता है उसकी मासूमियत सबको आकर्षित करती है तथा सब के दर्द दुख मिटा देती है। आँखों में कोई छल कपट नहीं होता। बच्चा जिस भी चीज को देखता है उसी के बारे जानने को उत्सुक रहता है। ८ से ११ वर्ष की उम्र तक पवित्रता बच्चे के कंठ में आ जाती है। बच्चे की आवाज बहत सुरीली होती है। जब लड़कों की आवाज बदल जाती है। पहले लड़के एवं लड़की की आवाज एक जैसी होती है। लड़कों की आवाज जब भारी हो जाती है तो समझो कि पवित्रता गले में पहुँच गई है। विपरीत लिंग का आकर्षण होने लगता है। १२ से १६ वर्ष की आयु तक पवित्रता मेरुदंड से होती हुई जननेइन्द्रिय में पहुँच जाती है। जब लड़कियों को मासिक आने लगता है। लड़को पर एक विशेष चमक एवं फुर्ती आ जाती है।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

### वनस्पती तूप

खरतर याला वनस्पती तूप का म्हणतात, असा मला प्रश्न पडतो. कारण हे तूप अजिबात नाही. वनस्पती तूप म्हटल्यावर सर्वसामान्यांना अगदी ते नैसर्गिकच तूप वाटते, म्हणून उपवासाच्या दिवशीही अन्नपदार्थ शिजविण्यासाठी किंवा तळण्यासाठी याचा वापर करतात. परंतु हे आरोग्यास घातक आहे. हे तूप नैसर्गिक नसून, खाद्य तेलापासून रासायनिक प्रक्रियेने बनविल हॅड्रोजनेटेड ऑईल्स किंवा वनस्पती तूप असे म्हणतात.

**वनस्पती तूप बनविण्याची प्रक्रिया :**

सरकी तेल, रेपसीड तेल, मोहडा तेल, सालसीड तेल, मोहरी तेल, धुपा तेल, सोयाबीन तेल, भात-तूस तेल, मका तेल, फुलवारा तेल अशा अनेक प्रकारच्या तेलांपासून हे अनैसर्गिक कृत्रिम घनीभूत तूप बनविले जाते. या तेलामध्ये सायट्रिक ॲसिड घालून तापवितात. नंतर कॉस्टिक सोड्याने त्याला धुऊन त्याचा रंग पांढरा केला जातो. अजून शुभ्रपणा येण्यासाठी आम्लमाती व कोळशाच्या सान्निध्यात पुन्हा तेल तापविली जातात. त्यानंतर ब्लीचिंग करून शुभ्रपणा वाढविला जातो. या प्रक्रियेमुळे तेलांमधील आवश्यक असलेली सर्व नैसर्गिक मूलद्रव्ये नष्ट होतात.

या तेलांना घट्टपणा येण्यासाठी यामध्ये हायड्रोजन गॅस सोडतात. या प्रक्रियेसाठी निकेल धातू वापरला जातो, जो आरोग्यास अतिशय घातक असतो. यानंतर कृत्रिम घनीभूत अनैसर्गिक तूप बनते, परंतु याचा वास नष्ट करण्यासाठी पुन्हा रासायनिक प्रक्रिया करून हे तूप ४ ते ५ तासांपर्यंत २४० अंश ते २६० अंश सेंटीग्रेडला तापवले जाते व सर्वांत शेवटी अशा पद्धतीने अनैसर्गिक वनस्पती तूप बनते.

**गुणधर्म :** वरील पद्धतीने अनैसर्गिक वनस्पती तूप बनल्यानंतर त्यातील सर्व पोषक घटक नष्ट होतात व उरते ते फक्त निःसत्त्व घन तूप! या तुपात कृत्रिम पद्धतीने जीवनसत्त्व 'अ' व 'ड' सर्वात शेवटी मिसळले जाते. परंतु हे तुप पचनास जड झाल्या मुळे शरीरावर त्याचा अतिरिक्त भार पडतो. पर्यायाने कृत्रिम जीवनसत्त्वांचा काहीही उपयोग होत नाही. हे तूप म्हणजे एकप्रकारे संपृक्त, स्निग्ध पदार्थ की जो सामान्य तापमानावर घन स्वरूपात राहतो. हे तूप सामान्य तापमानामध्ये घन स्वरूपात राहिल्यामुळे सेवन केल्यानंतर शरीरात देखील रक्तवाहिन्यांमध्ये घन स्वरुपात राहते.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# हिंदू, मुस्लीम धर्मभेद कि राजकिय बुध्दीबळ?

हिंदू, मुस्लीम की आणखी कोण? प्रश्न तसा साधाच पण तितकाच पराकोटिचाही. कधी काळी गौण, क्षुल्लक वाटत असलेला प्रश्न आज कळीचा मुद्दा बनु पहात आहे. किंबहुना नियोजनपुर्वक बनविला जातोय, हे एव्हाना आपल्या लक्षात आलेच असेल. समाधानाची बाब म्हणजे संपूर्ण समाजच आज धर्मवाद आणि जातीवादाचे समर्थन करणारा आहे असे बिलकुल नाही. समाजातील काही मोजके घटक जाणीवपूर्वक सोयीचा धर्मवाद आणि जातीयवादाला जास्तीत जास्त प्रमाणात सार्वजनिक स्तरावर नेण्याचा आवर्जुन प्रयत्न करतायेत हेही तितकचं खरं. पुतळे, मिरवणुका, झेंडे, घोषणाबाजी, दगडफेक, जाळपोळ, हिंसा, छोट्या-मोठ्या दंगली या सर्वांमध्ये तरुणांना जास्तीत जास्त गुंतवून ठेवण्याचे कसब काहींना चांगले जमले आहे. आज समाजामध्ये चालू असलेला धर्म आणि जातीचा खेळ, तो खेळ खेळवणारे प्रायोजक आणि खेळणारे खेळाडू यांच्या सभोवतीच संपूर्ण समाज गुरफटला जातोय हे वास्तव आहे. एकुणच संपूर्ण समाजमनावर या घटनांचा आघात होवून सामाजिक स्वास्थ बिघडते हे वास्तव आहे. अब्राहम लिंकन यांनी एका ठिकाणी म्हटले आहे की, दुष्ट माणसांच्या दुष्कृत्याची फळे नेहमी सज्जन माणसे भोगत असतात. या सोयीच्या विध्वंसक धर्मवादामागची कारणं काय असतील याचा विचार केल्यास ती कारणं प्रत्येक सुज्ञ माणसाला प्रकर्षाने जाणवतील. व्यक्तीपरत्वे काही कारणं कमी जास्त, वेगवेगळी असु शकतील पण त्यातही ठोस सर्वसामान्य कारणं नक्कीच जुळतील.

याबाबतीत आणखी विचारमंथन केल्यास लक्षात येईल की, प्राचीन काळापासून मानवी समाजव्यवस्थे-मध्ये अमुलाग्र बदल होत गेले. समाजव्यवस्था बदलत गेली तसे समाजव्यवस्थेसमोरील प्रश्न आणि प्राथमिकता बदलत गेली. बदलत्या समाजव्यवस्थेसमोरील प्रश्न सोडविण्यासाठी त्या त्या काळच्या सुधारणावादी महात्म्यांनी प्रयत्न केले आणि प्रश्न मार्गी लावले. प्रश्न सोडविण्याचा आणि आहे तिथुन आणखी पुढे जाण्याचा मानवी स्थायीभाव हा समाजव्यवस्था बदलण्यास कारणीभुत ठरत गेला. याचाच परिपाक म्हणजे अगदी अश्मयुगापासून आजपर्यंतची मानवी प्रगती ही थक्क करणारी आहे. या प्रगतीबरोबरच त्या त्या काळच्या काही कारभाऱ्यांनी धर्म आणि जातव्यवस्थेला सोयीस्करपणे विशेष महत्व दिले हे ही तितकेच खरे. तसं पाहिलं तर धर्म, जात आणि त्यावर आचरण हा ज्याचा-त्याचा वैयक्तिक विषय आहे. परंतु हा वैयक्तिक प्रश्न सामाजिक स्तरावर नेऊन कोणाच्या तरी सांगण्यावरुन धर्मांध होवून आपल्या कृतीमधून सामाजिक स्वास्थ्य बिघडवणे ही बाब आजकाल नवीन राहिलेली आहे. यामागे धर्म आचरण हे कारण नक्कीच नसून प्रायोजकांच्या आदेशाचे पालन, बेरोजगारी, दारिद्र्य, व्यसनाधिनता, चंगळवाद, भोगवाद, विषमता, आधुनिक स्वैर जीवनशैली, कुटुंबापासून वाढलेलं अंतर, नातेसंबंधातला दुरावा, जीवघेणी स्पर्धा, ढासळलेलं मानसिक आरोग्य, त्यातुन निर्माण झालेला ताणतणाव अशी काही कारणं आहेत. मनुष्य ही ईश्वराची सर्वोत्तम निर्मीती आहे असं प्रत्येक धर्म सांगतो. धर्माच्या बाबतीत सांगायचं तर प्रत्येक धर्माची स्थापना ही मानवी जीवन सुसह्य करण्यासाठी, मानवाला सुसंस्कृत आणि सभ्य बनविण्यासाठी झालेली आहे. प्रत्येक व्यक्ती ही सोयीप्रमाणे धार्मिक होण्याऐवजी जर खरोखर धर्म शिकवतो तशी धार्मिक झाली तर मला वाटतं पृथ्वीवरच स्वर्ग अवतरल्यासारखे दिवस नक्कीच येतील.

मुळात मानवी आयुष्य हे अगदीच मर्यादित आहे, ते संपणारे आहे याचे भानच आज काहींना राहिलेले नाही, ही परिस्थीती आहे. जणु काही हजारो वर्षे आपण या पृथ्वीवर जगणार आहोत अशा अविर्भावात काही माणसं आयुष्य जगतायेत. धार्मिक विध्वंस करुन, धर्मा-धर्मात, जाती-जातीत विषमतेचे विष पेरुन येणाऱ्या पिढीसमोर आपण काय आदर्श ठेवतोय, त्यांच्यासाठी कोणतं जग आपण सोडून जाणार याचा विचार देखील त्यांना राहिलेला नाही. मानवी आयुष्य आणि धर्म या एकाच नाण्याच्या दोन बाजु असु शकतात परंतु आयुष्य म्हणजे धर्म आणि धर्म म्हणजेच आयुष्य असा अतिरेकी विचार मानवी सदृढ समाजव्यवस्थेस नक्कीच घातक आहे. मानवी भावभावना आणि जीवनपध्दती यांचा विचार करतांना धर्माचे महत्व नक्कीच अधोरेखित होते परंतु समोरील व्यक्ती हिंदू आहे, मुस्लीम आहे, ख्रिश्चन किंवा अन्य कुठल्या धर्माची आहे केवळ यावरुन कुणाच्या विवेकबुध्दीत फरक पडावा हे मात्र धोकादायक आहे.

दंगलीमध्ये दगड फेकणारा आणि दगडाचा घाव झेलणारा दोघांचेही नुकसान होत असते. वेळेचा कचरा करत फिरणारे, परिस्थितीच्या सुक्या तर अतिसुखाच्या ओल्या दुष्काळाने करपलेले तरुण या दंगलीत भाग घेतात. माथे भडकवलेली तरुण मुलं दंगलीत मारामारी, दगडफेक करुन, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करुन जेलमध्ये जातात आणि आयुष्य बर्बाद करुन घेतात. पोलीस स्टेशन, कोर्ट कचेरींमध्ये स्वतःचं पुढील आयुष्य अडकवून ठेवतात. दंगलीत त्यांनी फेकलेल्या दगडाचा घाव नकळत त्यांच्या आईवडिलांच्या हृदयाला होतो याचा विचारही त्यांच्या मनात येत नाही. सहाजिकच मुलाच्या भविष्यासाठी स्वप्न पाहणारे त्यांचे आईवडिल मात्र दुःखाच्या खाईत लोटले जातात हेही तितकचं खरं. म्हणतात ना, बाप गेल्यावर तुम्हाला एका दिवसात समजदार, जबाबदार, शहाणं व्हावं लागतं, मग तुमचं वय काहीही असो. पण तुम्हाला समजदार, जबाबदार, शहाणं होण्यासाठी बापाने मरायलाच हवे का? 'जितेपणी पोराच्या समजदारीने, कर्तबगारीने बापाच्या डोळ्यांत चार आसवं यावीत यापेक्षा दुसरं सुख त्या बापासाठी काय असेल?' पण ही भरकटलेली तरुणाई मात्र याबाबतीत कपाळकरंटीच म्हणावी लागेल.

दंगली कोणीही घडवल्या तरी रोजीरोटीसाठी झटणारा सामान्य माणुसच त्याचा बळी असतो ही सत्य परिस्थिती आहे. काही महत्वाकांक्षी नेते व नेत्यांच्या गटाकडून सामान्य माणसाच्या मनात निर्माण केली गेलेली इतर धर्माविरोधीची धग पेटत राहण्याची खबरदारी घेतली जाते आणि योग्य वेळी त्या आगीचे रुपांतर वणव्यात करण्याचा डाव साधला जातो हे आता स्पष्ट होवु लागले आहे. दंगल झाली म्हणजे दोन भिन्न गटांमधील उत्स्फूर्त, भावनिक नैसर्गिक उद्रेक झाला, असे म्हणण्याची वेळ आता राहिलेली नाही. दंगल म्हणजे कोणीतरी धुर्त राजकीय पंडीताने राजकीय फळे घेण्यासाठी त्याला पाहिजे तेव्हा दंगलीचे झाड हलविल्याचे समजून घेण्यासारखे आहे.

सगळेच राजकारणी वाईट नसले तरी, राजकारण आणि धर्मकारण या दोन्हींचे व्यावसायिकरण झालयापासुन या व्यवसायात जम बसविण्यासाठी व व्यवसायाची भरभराट होण्यासाठी संबंधित व्यवसायिक नानाविध प्रयत्न करतात हे मात्र नक्की. त्याच प्रयत्नांचा भाग म्हणून संख्या, धर्म व जातीचे गणित साध्य करण्यासाठी धर्म आणि जातीच्या सोंगट्या घेवुन बुध्दीबळाचा खेळ खेळला जातो. बुध्दीबळामध्ये जे खेळात सामील असतात तेच मारले जातात, परंतु या राजकीय बुध्दीबळात मात्र जे खेळात सहभागी नाहीत ते ही मारले जातात. स्वतःला कार्यकर्ते, धर्मवीर म्हणवणारे लाभार्थी आदेशाप्रमाणे दंगली घडवायला खेळात उतरतात, या बुध्दीबळाचा पट जिंकुन देतात परंतु स्वतःच्या व त्या खेळाशी तिळमात्र संबंध नसणाऱ्या सर्वसामान्यांच्या आयुष्याचा खेळ करतात हे मात्र नक्की.

हे सगळं जरी खरं असलं तरी, मी आणि माझा मित्र संदीप चहाच्या टपरीवर जेव्हा धार्मिक दंगलींबद्दल चर्चा करतो तेव्हा माझा धर्म आणि तुझा धर्म यावरुन आमचे भांडण होत नाही आणि जोपर्यंत नदीम आणि संदीपसारख्या मित्रांमध्ये अशी भांडणे होत नाहीत, तोपर्यंत समाज सदृढ आणि सशक्त आहे, असे समजण्यास हरकत नाही. सरतेशेवटी व्हॉटस्‌अॅप युनिव्हर्सिटीमध्ये वाचलेल्या छान ओळी या ठिकाणी आवर्जून नमूद कराव्याशा वाटतात

*ना गीता बुरी है ना कुराण बुरा है ।*
*ना हिंदू बुरा है ना मुसलमान बुरा है ।*
*ना खुदा बुरा है ना भगवान बुरा है*
*आपस मे जो लडवा रहा है वो शैतान बुरा है ।*

**- अॅड. नदीम अन्वर सय्यद**
मोबाईल - ९९२२०७८९४३
धर्मादाय आयुक्त कार्यालयासमोर, सावेडी, नगर
लेखक - असंही जगणं असतं (विश्व थॅलेसेमियाचे)



## नवीन पेंट इन्स्पेक्शन बूथचे फोक्सवॅगन अहमदनगर येथे अनावरण

नगरमध्ये पहिल्यांदाच फोक्सवॅगन अहमदनगर येथे पेंट इन्स्पेक्शन बूथचे अनावरण आमदार अरुण जगताप यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमात कंपनीचे अधिकारी डेबजीत मुल्लीक, हिमकुंष मोटर्स प्रा. लि. चे डायरेक्टर रितेश नय्यर आणि संपूर्ण टीम उपस्थित होती. सुपरटेक हेवी इंजिनियर यांनी तयार केलेले सुंदर पेंट इन्स्पेक्शन बूथ हे २५०० ल्यूमन्स प्रकाशाच्या गुणवत्तेसह सुसज्ज आहे, ज्यामुळे गाडीला पेंटिंग, सिरॅमिक कोटिंग, पॉलिशिंग, डिटेलिंग इ. काम केल्यानंतर त्याचे बारकाईने गुणवत्ता तपासण्यासाठी मदत होईल. या नवीन सुविधेमुळे ग्राहकांना अधिक चांगली सेवा प्रदान करण्यास आम्हाला मदत होईल. अधिक माहितीसाठी संपर्क : ७७५७०००३३२.

## मंगल भक्त सेवा मंडळाकडून इसळक शाळेत वह्यांचे वाटप

नगर - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इसळक, तालुका नगर येथे इ. १ ली ते इ. ४ थी पर्यंतच्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मंगल भक्त सेवा मंडळ अ.नगर च्या वतीने शालेय साहित्य थ्री इन वन वह्यांचे वाटप मंडळाचे सेवेकरी किर्तीकुमार कोठारी, योगेश कंठाळे, सुनिल दळवी, आप्पासाहेब उर्फ बंडू सप्रे, संतोष व्यवहारे यांचे हस्ते मंडळाचे अध्यक्ष श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (राजाभाऊ कोठारी) यांच्या वतीने एक सामाजिक कार्य व दायित्व या भावनेतून करण्यात आले. याप्रसंगी मंडळाचे सेवेकरी संतोष व्यवहारे यांनी आपल्या मंडळाच्या वतीने चालू असलेल्या इतर उपक्रमांबाबत माहिती देऊन त्याचा उद्देश स्पष्ट केला.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इसळक, तालुका नगर येथील होतकरू विद्यार्थ्यांना मंगल भक्त सेवा मंडळ अ.नगर च्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करताना मंडळाचे सेवेकरी किर्तीकुमार कोठारी, योगेश कंठाळे, सुनिल दळवी, आप्पासाहेब उर्फ बंडू सप्रे, संतोष व्यवहारे, संतोष व्यवहारे आदी.

यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून समाधान वाटले तद्नंतर शाळेचे मुख्याध्यापिका साधना क्षीरसागर यांनी शाळेच्या वतीने सद्गुरु श्री शंकरबाबा महाराज व गुरुवर्य श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (राजाभाऊ कोठारी) यांनी दिलेल्या मानवतेच्या शिकवणीची तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक साहित्याप्रती आपल्या भावना व्यक्त करून भावी काळात असेच सहकार्य आपल्या मंडळाच्या वतीने राहील अशी अपेक्षा व्यक्त केली. शाळेच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात गुरुवर्य भाऊंचा सन्मान मंडळाचे सेवेकरी योगेश कंठाळे यांनी स्विकारला. याप्रसंगी शाळेतील सहशिक्षक प्रविण शेळके यांनी सूत्रसंचालन करून मंडळाचे कार्य सेवाभावी वृत्तीने कसे चालू आहे व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी कशाप्रकारे गरजवंत आहेत हे उदाहरणासह पटवून दिले. आपल्या मंडळास या शाळेत विद्यार्थ्यांसाठी सेवा करण्याची संधी तसेच शाळेतील सहशिक्षका सुरेश चंदर व सुनिता जाधव यांनी या कार्यात सहकार्य केल्याबद्दल संतोष व्यवहारे यांनी शाळेचे आभार मानले.

# निरोगी जीवनासाठी नियमित व्यायाम, योग्य आहार, मनाची प्रसन्नता खरे औषध

### डॉक्टर रणजीत सत्रे यांचे प्रतिपादन; सावेडी येथे आरोग्यविषयक व्याख्यानास ज्येष्ठ नागरिकांचा प्रतिसाद

नगर - योग्य आहार आणि मनाची स्थिरता, प्रसन्नता हेच खरे सर्व आजारांवरील औषध आहे. शरीराचा आजार हा औषधांशिवाय बरा होऊ शकतो. हे नोबेल विजेत्या च्या शास्त्रज्ञांनी आपल्या संशोधनातून सिद्ध केले आहे. निरोगी जीवनासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम, मनाची प्रसन्नता, चांगली झोप वेळेत घेणे हीच खरी औषधे आहेत. त्यामुळे शिस्तबद्ध जीवनशैली अंगीकारण्याचा प्रयत्न करा, असे प्रतिपादन डॉ.रणजित सत्रे यांनी केले.



स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने डॉ.रणजीत सत्रे व डॉ. योगिता सत्रे यांचा सत्कार करण्यात आला.

सावेडी येथील धन्वंतरी बागेजवळील पालिका हॉल येथे स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ (भुतकरवाडी परीसर) व राजयोग फाउंडेशनतर्फे निवृत्तीनंतर जीवनात मानसिक व शारीरिक आरोग्य कसे चांगले ठेवावे या विषयावर डॉ.रणजीत सत्रे व डॉ. योगिता सत्रे यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी डॉ.सत्रे यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटशनमधून औषधांविना आजार बरे करण्याबाबत विविध दाखले दिले. यावेळी स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भीमाशंकर लांडे, सचिव आप्पासाहेब बेद्रे, खजिनदार विश्वनाथ जाधव, संघाचे सदस्य सुनील काळे, रघुनाथ कोतकर आदींसह जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

डॉ.योगिता सत्रे म्हणाल्या, पुढचा विचार न करता माणसाने वर्तमानकाळात जगले तर त्याचे निम्मे आजार बरे होतील.अनेक आजारांवर व्यायाम व हसणे औषध आहे. ९० टक्के आजार शरीरातूनच निर्माण होतात. रक्तदाब, साखरेची पातळी वाढणे हे आजार शरीरातच तयार होतात. त्यामुळे ते औषधांनी बरे होणार नाहीत. त्यासाठी जीवनशैली बदलण्याची गरज आहे. ध्यानाचे महत्त्व विषद केले. काही प्रात्यक्षिके करून घेतली. तसेच दिनचर्या कशी असावी. याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

भीमाशंकर लांडे म्हणाले, निवृत्तीनंतर ज्येष्ठ नागरिकांना अनेक आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते. निरोगी व सुदृढ आरोग्य चांगले ठेवण्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. हे लक्षात घेऊन स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने आरोग्य विषयक व्याख्यानाचे आयोजन केले आहे. आभार हिंगे सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# ओंकार संगीत निकेतनच्या 'भक्तीरंगा'त रसिक मंत्रमुग्ध

नगर - दरेवाडी येथे ओंकार संगीत निकेतन प्रस्तुत आणि पावन हनुमान मंदिर आयोजित भक्तिरंग या अभंगवाणी आणि भक्तीगीतांच्या मैफलीने रसिकांची मने जिंकली. या मैफलीत श्रेया पंडित, तन्वी ढोरे, श्रीराम खांदवे, प्रबुद्ध शिंदे, वैभवी चव्हाण, वैष्णवी चव्हाण, सानवी मुरुमकर, श्रद्धा गौड, पायल राऊत, संस्कृती कोठुळे, श्रद्धा शिंदे, ईश्वरी ननवरे, अक्षरा घुटे, सानिका आवटे, देविदास सोनसळे, अंकित पवार, गायत्री धनलगडे, संस्कार भोर या विद्यार्थी कलाकारांनी आपली कला सादर केली.



ओंकार संगीतनिकेतन प्रस्तुत आणि पावन हनुमान मंदिर आयोजित भक्तीरंग या अभंगवाणी आणि भक्तीगीतांच्या मैफिलीने रसिकांची मने जिंकली.

तूच सुखकर्ता तूच दुःखहर्ता, एकतारी संगे, अबीर गुलाल, आली कुठूनशी कानी, विठु माऊली तू, अमृताहुनी गोड, माझे माहेर पंढरी, खेळ मांडीयेला, अवघे गर्जे पंढरपूर, कानडा राजा पंढरीचा, मेरे घर राम आये है, श्रीराम जानकी बैठे है मेरे सीने में अशा अनेक बहारदार गीतांनी मैफलीत रंग भरला.

या विद्यार्थी कलाकारांचे कौतुक रसिकांनी केले. तसेच संपूर्ण कार्यक्रमाला तबला साथ प्रसाद सुवर्णपाठकी यांनी केली. तसेच त्यांनी आपला विद्यार्थी सुपर्ण प्रताप यांच्या समवेत केलेल्या तबला सोलो वादनाने रंगत आणली.

तालवाद्याची साथ वैष्णवी, राधिका आणि गोपाल कोल्हे यांनी केली. कार्यक्रमातील सर्व गीतांना आपल्या शब्द सूत्रांमध्ये बांधून उत्तम सूत्रसंचालन सौ. जान्हवी देऊळगांवकर यांनी केले. कार्यक्रमाला मार्गदर्शन व संवादिनी साथ ओंकार देऊळगांवकर यांनी केली. कार्यक्रमाला जालिंदर भोगाडे, संगीता व अविनाश देऊळगांवकर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आविष्कार, सोहम म्हस्के, अजित भोसले यांनी परिश्रम घेतले.



पेमराज सारडा महाविद्यालयात सीए उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना क्लासिक व्हिल कंपनीचे संचालक व उद्योजक सुनील मुनोत.

## सारडा महाविद्यालयातील सीए उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सन्मान

नगर - पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या वतीने नुकत्याच झालेल्या सीए परीक्षेत महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार क्लासिक व्हील कंपनीचे संचालक व उद्योजक सुनील मुनोत यांच्या हस्ते करण्यात आला. हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष अॅड. अनंत फडणीस, ज्युनियर कॉलेज कमिटीचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, प्रबंधक अशोक असेरी आदींसह वाणिज्य विभागाचे प्राध्यापक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

यावेळी सारडा महाविद्यालयातील सीए फायनल परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या कीर्ती सिंग, प्रथमेश मुनोत, दत्तात्रय पारधी, ऋत्विक रेखी आदींचा सत्कार तसेच तर सीए इंटरमिजिएट परीक्षेत हर्षाली कुलकर्णी, खुशी सहानी, ओमकार वाबळे, ऋतुजा पटवा, अथर्व बारस्कर, श्रेयस मुळे, ऋचा फाटक, पार्थ बेद्रे, रीत मेहेर, दिनेश बजाज, वैभव मुनगेल, वेद सुवर्णपाठकी व संस्कृती कटरीया आदी विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

मार्गदर्शन करताना प्रा.शिरीष मोडक म्हणाले, सारडा महाविद्यालयाची चौफेर प्रगती होत आहे. सीए परिक्षेत उतुंग यश मिळवून विद्यार्थ्यांनी सारडा महाविद्यालयाचा लौकिक वाढवला आहे.

अॅड.अनंत फडणीस म्हणाले, एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने सिए परिक्षा उत्तीर्ण होणे हे अभिमानास्पद आहे. सारडा महाविद्यालयातून सिए इंटरशिप साठी विद्यार्थ्यांना सिए असोसिएशनच्या सहकार्य करत आहे याचा लाभ विद्यार्थ्यांना होत आहे.

उद्योजक सुनील मुनोत म्हणाले, सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी नवेनवीन ज्ञान आत्मसात करताना आपली भारतीय संस्कृतीसुद्धा आत्मसात करून जपा. नगरच्या एमआयडीसीमध्ये खूप मोठे उद्योग व कारखाने आहेत. त्यास विद्यार्थ्यांनी भेटी देवून नवे ज्ञान आत्मसात करावे. यासाठी मी पुढाकार घेईल. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी प्रगतीची माहिती दिली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. राजु रिक्कल यांनी दिला. उपप्राचार्य डॉ. मंगला भोसले यांनी आभार मानले,

# लक्ष्मीआई यात्रा उत्सवाची शहरात रंगली मिरवणूक

नगर - आषाढ अमावस्यानिमित्त शहरातील रामवाडी येथे लक्ष्मीआई यात्रा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. रामवाडी परिसरातून पारंपारिक वाद्यांच्या गजरात मिरवणुक काढण्यात आली होती. घोड्यांच्या बग्गीत असलेल्या लक्ष्मीमातेच्या मुर्तीने सर्वांचे लक्ष वेधले. भंडाऱ्याची उधळण व लक्ष्मीमातेचा जयघोष करीत भाविक मिरवणुकीत सहभागी झाले होते.



आषाढी अमावस्येनिमित्त शहरात रामवाडी येथील लक्ष्मीआई यात्रा उत्सवानिमित्त घोड्याच्या वर्गणीतून काढण्यात आलेल्या मिरवणुकीचा प्रारंभ करताना आ. संग्राम जगताप. समवेत भाविक भक्त महिला-पुरुष.

आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत मिरवणुकीचे प्रारंभ करण्यात आला. वर्चस्व ग्रुपचे सागर मुर्तडकर व इंगळे प्रतिष्ठानचे विकी इंगळे यांच्या हस्ते मिरवणुकीच्या प्रारंभी नारळ फोडण्यात आला. दरवर्षी लक्ष्मीआई यात्रा उत्साहात साजरी केली जाते. युवकांनी प्रवरा संगम येथून कावडीने आणलेल्या जलने रामवाडी येथील लक्ष्मी मातेच्या मुर्तीला अभिषेक घालण्यात आला. विधीवत पूजा करून लक्ष्मीमातेच्या उत्सवमुर्तीची मिरवणुक शहरातून काढण्यात आली. भाविकांसह युवकांनी भक्तीगीतांवर ठेका धरला होता. पारंपारिक वाद्यांनी संपूर्ण परिसर दणाणून निघाला. ही शोभायात्रा कोठला, मंगलगेट, सर्जेपूरा, रंगभवन येथून मार्गक्रमण होऊन रामवाडी येथे तिचा समारोप झाला.

तसेच यात्रेच्या आदल्यादिवशी रामवाडीत यात्रेनिमित्त भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. भंडारा वाटपाचे प्रारंभ मावळा प्रतिष्ठानचे अध्यक्ष निलेश म्हसे पाटील, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे सुरेश बनसोडे, माजी नगरसेवक सचिन जाधव, माजी नगरसेवक भाऊसाहेब उनवणे यांच्या उपस्थितीत झाले. नागरिकांनी भंडाऱ्याचा लाभ घेतला. हा लक्ष्मीआई यात्रा उत्सव यशस्वी करण्यासाठी प्रकाश वाघमारे, सागर साठे, सतीश साळवे, दीपक साबळे, सुरेश वैरागर, अश्विन खुडे, पप्पू पाटील, दीपक सरोदे, किशोर उल्हारे, दीपक लोखंडे यांनी परिश्रम घेतले.



शाळेतील विद्यार्थ्यांना कपाळावर गंध लावण्यास बंदी हटवा, या मागणीचे निवेदन हायस्कूलच्या मुख्याध्यापकांना देताना बजरंग दलाचे पदाधिकारी.

# शाळेतील विद्यार्थ्यांना कपाळावर गंध लावण्यास बंदी हटवा अन्यथा आंदोलन

भिंगार – शाळेतील विद्यार्थ्यांना 'कपाळावर गंध' लावण्यास बंदी केल्याबाबत आणि अशी कोणतीही बंदी करु नये यासाठी भिंगार येथे विश्वहिंदू परिषद – बजरंग दलाने हायस्कूलच्या मुख्याध्यापकांना निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, भारतात प्राचीन काळापासून हिंदू संस्कृतीमध्ये मंदिरात, देवघरात दर्शन घेऊन देवा समोरील गंध आपल्या कपाळावर लावून दिवसाची सुरुवात करण्याची फार जुनी परंपरा आहे. तसेच या परंपरेचे चांगले परिणाम विज्ञानाने सिद्ध झाले आहे. कपाळावर गंध लावल्यामुळे एकाग्रता वाढते तसेच तेथे आज्ञाचक्र असल्यामुळे एकप्रकारे शरीर व मन नियंत्रित राहते. हा देश हिंदूचा आहे व या देशात बहुसंख्य हिंदू राहतात, असे असतांना आपण विद्यार्थ्यांना 'कपाळावर गंध' लावण्यास बंदी करुन येथील बहुसंख्य हिंदूच्या भावनांचा अनादर करत आहात. मंदिरात, देवघरात दर्शन घेऊन देवा समोरील गंध आपल्या कपाळावर लावण्याचा विद्यार्थ्यांचा हक्क आहे त्यापासून आपण त्यांना वंचित ठेवू शकत नाहीत. यापुढे गंध लावण्यास विरोध करू नये व तसे केल्यास शाळा व पदाधिकारी यांच्या विरोधात आंदोलन करण्यात येईल, असा इशारा बजरंग दलाचे संयोजक सतीष (नाना) मोरे व सदस्य यांनी दिला आहे.

यावेळी बजरंग दलाचे सदस्य बादल डोकडे, राहुल धोत्रे, सुनील नवगिरे, अरुण ठाकुर, सूरज गाडेकर, सोनू तागडकर, लहू धोत्रे, दिपक धोत्रे आदि युवा सदस्य उपस्थित होते.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेत पार पडली प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया, ९२ टक्के मतदान होऊन निवडून आलेल्या प्रतिनिधींचे मंत्रिमंडळ स्थापन

## विद्यार्थ्यांच्या बोटावर लागली मतदानाचा हक्क बजावल्याची शाई

नगर – लोकशाही सुदृढ करायची असेल तर निवडणूक स्वच्छ व पारदर्शक होण्याची गरज असते. त्यासाठी शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना लोकशाहीचे शिक्षण देण्याच्या उद्देशाने लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयात निवडणुक प्रक्रिया राबवून शालेय मंत्रिमंडळ निवडण्यात आले. यामध्ये उमेदवारी अर्ज भरणे, अर्जाची छाननी, अर्ज माघार घेणे, चिन्ह वाटप करणे व प्रचार करणे प्रत्यक्ष मतदानाचे सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडल्या. शाळेत ९२ टक्के मतदान होऊन उमेदवार निवडण्यात आले. यामध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी मतदान केले.





लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेत निवडणूक प्रक्रिया पार पाडताना विद्यार्थी–विद्यार्थिनी प्रतिनिधी. दुसऱ्या छायाचित्रात मतदान करणारे विद्यार्थी–विद्यार्थिनी.

शालेय शिक्षणात नागरिकशास्त्र शिकवले जातात पण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून नागरिकशास्त्र शिकण्याचा यशस्वी प्रयोग लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेत करण्यात आला. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी शाळेच्या निवडणुकीतून आपले प्रतिनिधी निवडले व ही निवडणूक प्रक्रिया पार पडून नवनियुक्त मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा शाळेत पार पडला.

विद्यार्थ्यांमध्ये राजकारणाबाबत निर्माण झालेली उत्सुकता, विद्यार्थ्यांना लोकशाहीचा अर्थ समजून मतदानाच्या हक्काचे प्रबोधन व्हावे याकरिता शाळेत निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. निवडणुकीतील उमेदवारांनी शाळेत प्रचार सभा घेऊन निवडून आल्यास शाळेच्या विकासात्मक कार्यासाठी काय योगदान देणार हे देखील स्पष्ट केले. नियोजनबद्ध पद्धतीने उमेदवारांनी निवडणुकीचा प्रचार केला. दहावीच्या विद्यार्थ्यांची व शिक्षकांची मतदार यादी बनवून मतदान घेण्यात आले.

मतदान करताना विद्यार्थी व शिक्षकांची स्वाक्षरी घेऊन विद्यार्थ्यांच्या बोटावर शाई लावण्यात आली. बॅलेट पेपरद्वारे मतदान करुन विद्यार्थ्यांनी निवडणुकांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन मतदानाचा हक्क बजावला. एकूण १३ उमेदवार रिंगणात होते. मतदान संपल्यानंतर लगेचच मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात आला. या निवडणुकीत तेजस थोरात सर्वाधिक मतांनी निवडून आला. तसेच अनुक्रमे स्नेहा काकडे, अजिंक्य पगारे, स्वराज्य एकशिंगे, स्वराज दळवी, श्रेयश घालमे, साक्षी खरात या निवडून आलेल्या प्रतिनिधींचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे.

केंद्रप्रमुख म्हणून मयूर पवार यांनी तर मतदान अधिकारी म्हणून श्रेया गोटे, गौरी सपाटे, कीर्ती गोलवड यांनी काम पाहिले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून वर्गशिक्षक अमित धामणे यांनी महत्त्वाची जबाबदारी सांभाळली. माध्यमिकच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिकचे मुख्याध्यापक शिवाजी लंके यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणुक प्रक्रिया पार पडली.

मतदान प्रक्रियेनंतर मतपेट्या जमा करुन विजयी झालेल्या उमेदवारांचा सत्कार करण्यात आला. निवडणूक महत्त्व मुलांना पटवून सांगण्यात आले. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात ही निवडणूक प्रक्रिया पार पाडली. निवडलेल्या प्रतिनिधीमधून मंत्रिमंडळाची नियुक्ती करण्यात आली. निवडणुक प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी प्रदीप पालवे व मंगेश कारखिले या शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# सामाजिक आणि अध्यात्मिक कार्यातून भिमराज आव्हाड यांनी ठसा उमटविला

**आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन**

नगर – सामाजिक आयुष्यात अनेक समस्या असतात. त्यांचा यशस्वीपणे सामना करीत समाजासाठी काम करण्याचे ध्येय समोर ठेवून सर्वसामान्य माणसांसाठी भीमराज आव्हाड यांनी काम केले. त्यामुळे कार्यकर्त्यांचे ते भाऊ झाले तर सर्वसामान्यांसाठी मामा म्हणून ओळख निर्माण केली. आजही अन्यायाविरुद्ध लढत अनेक प्रश्नांसाठी पुढाकार घेतात. सामाजिक कामातून ते अध्यात्मिक कार्यामध्ये स्वतः ला झोकून देत काम करीत राहिले व आपल्या कामाचा वेगळा ठसा त्यांनी उमटविला असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.



निर्मलनगर येथील श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष भीमराज आव्हाड यांचे वाढदिवसानिमित्त आ. संग्राम जगताप यांनी सत्कार केला. याप्रसंगी राहुल सांगळे, संतोष ढाकणे, किरण लटपटे, प्रताप भिंगारदिवे, आकिब शेख, वैभव ढाकणे, अभिषेक हरबा, अमर भोसले, निलेश नेहुल, जितू पाटील आदी. (छाया – विजय मते)

निर्मलनगर येथील श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष भीमराज आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त आ. संग्राम जगताप यांनी सत्कार केला. यावेळी राहुल सांगळे, संतोष ढाकणे, किरण लटपटे, प्रताप भिंगारदिवे, आकीब शेख, वैभव ढाकणे, अभिषेक हरबा, अमर भोसले, निलेश नेहुल, जितू पाटील उपस्थित होते.

आ. जगताप पुढे म्हणाले भीमराज आव्हाड यांचे ग्रामीण भागातील काम चांगले असून पांगरमल गावाचा विकास करून गावातील अनेक प्रश्नांना प्राधान्य देताना आंदोलने, मोर्चे काढून सर्वसामान्य लोकांना न्याय दिला. त्यांच्या या कामामुळे शहरातही कार्यकर्त्यांची मोठी ताकद त्यांच्यामागे असल्याने उपनगरातील विविध प्रश्नांना न्याय देण्यासाठी ते झगडतात त्यांच्या या कामामुळे कार्यकर्ते सदैव पाठबळ देत असतात.

भीमराज आव्हाड म्हणाले नगर शहराला आ. जगताप यांचे नेतृत्व लाभल्याने शहराबरोबरच उपनगराचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला. त्यांच्या पाठीशी सदैव खंबीरपणे कार्यकर्त्यांसह आम्ही उभे राहून त्यांचे काम करू अशी ग्वाही त्यांनी दिली.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या समितीवर प्रा. माणिक विधाते यांची नियुक्ती



नगर – शासनाच्या आदेशान्वये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची विधानसभा क्षेत्र निहाय समिती गठित करण्यात आली असून, या समितीच्या सदस्यपदी प्रा. माणिक विधाते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पालकमंत्री तथा महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शिफारशीने प्रा. विधाते यांची समितीवर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे.

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांचे आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेची यशस्वी अंमलबजावणी होण्यासाठी विधानसभा क्षेत्र निहाय समिती गठित करण्यात येत आहे. यामध्ये दोन अशासकीय सदस्यांना संधी देण्यात आली आहे.

प्रा. माणिक विधाते सन १९९९ सालापासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे क्रियाशिल सदस्य आहेत. त्यांनी राष्ट्रवादीचे माजी शहर उपाध्यक्ष व शहर सरचिटणीस ही जबाबदारी सांभाळून सन २०१७ ते जानेवारी २०२४ पर्यन्त राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहिले. शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त म्हणून ते काम पाहत आहे. शहर बँकेचे ते संचालक असून, सावित्रीबाई व महात्मा ज्योतीबा फुले स्मारक कृती समिती व अहमदनगर तायक्वांदो स्पोर्टस असोशिएशनचे अध्यक्ष तर जिल्हा क्रिकेट असोशिएशनचे सहसचिव म्हणून जबाबदारी सांभाळत आहे.

# नेवासा तहसिल कार्यालयात ९ ऑगस्टला जप्त वाळू साठ्याचा लिलाव

नगर – नेवासा तालुक्यात जप्त करण्यात आलेल्या मौजे सुरेगाव गंगा, घोगरगाव तसेच मौजे बोरगाव येथे वाळू साठ्यांचा लिलाव अटी व शर्तीच्या अधिन राहुन ९ ऑगस्ट रोजी सायं.४ वाजता तहसिल कार्यालय, नेवासा येथे आयोजित करण्यात आला आहे. इच्छुकांनी अनामत रक्कम भरुन लिलावात सहभागी होण्याचे आवाहन उप विभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे. मौजे सुरेगाव येथे अनाधिकृत असा १२५ ब्रास रेतीसाठी आढळून आला असुन मौजे घोगरगाव येथे ५० ब्रास तर मौजे बोरगाव येथे ३० ब्रास अनाधिकत असा रेतीसाठी आढळून आला आहे. लिलावाच्या अटी व शर्ती तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, नेवासा येथे उपलब्ध असुन इच्छुकांनी या लिलावात सहभाग नोंदवावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

# छत्रपती अभियंत्रिकीच्या विद्यार्थांनी जाणून घेतल्या विदेशातील शिक्षणाच्या संधी

नगर – नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये ८ ऑगस्ट रोजी 'स्टडी अ‍ॅब्रोड ऑपॉर्च्युनिटीज' या विषयावर झालेल्या व्याख्यानासाठी के सी ओवरसिज एज्युकेशनचे मोहम्मद आझम हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते.

त्यांनी विद्यार्थ्यांना विदेशातील शिक्षणाच्या संधी, विदेशात शिक्षण का घ्यावे ? त्यासाठी लागणारी पात्रता, तेथील विद्यापीठे व नोकरीच्या संधी, शिक्षणासाठी लागणारे पैसे, विदेशात उपलब्ध असणारे विविध कोर्सेस इत्यादी विषयांसंबंधी सखोल माहिती देत यु. एस. ए., ऑस्ट्रेलिया, यू. के., कॅनडा इत्यादी देशांमधे अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना विशेष स्वरूपाने असणाऱ्या कोर्सेसची माहिती अगदी सविस्तर मध्ये समजावून सांगितली.



छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमोर विदेशातील शिक्षणाच्या संधी विषयावर बोलताना के.सी. ओवरसीज एज्युकेशनचे मोहम्मद आझम. समोर उपस्थित विद्यार्थी.

विदेशामध्ये शिक्षणासाठी उपलब्ध असणाऱ्या ज्यास्तीत ज्यास्त संधी विद्यार्थ्यांनी जाणून घेवून त्यासाठी आवश्यक असणारे कौशल्ये आत्मसात करावीत, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयातील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाद्वारे आयोजित केल्या गेलेल्या या सेमिनार ला विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी म्हणून प्रा. एस. एम. वाळके तसेच समन्वयक म्हणून प्रा. ए आर माने, प्रा. एम पी आठरे, प्रा. जी बी साळुंके, प्रा. पी. डी. कोतकर तसेच सर्व विभागप्रमुख व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. शिल्पा वाळके यांनी केले. या कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख प्रा. पी. जी. निकम, डॉ. एम. के. भोसले, प्रा. एस. एम. वाळके, प्रा. एस. आर. पवार, प्रा. ए. बी. काळे, प्रा. पी.एस. कोहकडे आदी उपस्थित होते.

घ.नं. 505/सदर बाजार/2024-25
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक– 07/08/2024

**जाहीर नोटीस**

या नोटीशीद्वारे जाहीर करण्यात येते की, (1) कलीम रफीक शेख, वय 53 वर्षे, धंदा–व्यापार, (2) नौशिन कलीम शेख, वय 41 वर्षे, धंदा–गृहिणी, (3) गजाफी मुसा शेख, वय 50 वर्षे, धंदा–व्यापार, (4) गफ्फार मुसा शेख, वय 49 वर्षे, धंदा–व्यापार, सर्व राहणार घर नं. 509/510, जंगी वाडा, शुक्रवार बाजार, भिंगार, अहमदनगर यांनी घर नं. 505, सदर बाजार, सर्व्हे नं. 213-461 सदर बाजार, अहमदनगर छावनी परिषद हे (1) रजिस्टर्ड खरेदीखत क्रं. 388/2024 दि. 17/01/2024 (2) रजिस्टर चुक–दुरुस्ती लेख क्र. 6084/2024 दि. 27/06/2024 च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रीतसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत.

सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 30 (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी, छावणी परिषद, अहमदनगर यांचेकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
घ.नं. 505, सदर बाजार,
क्षेत्रफळ 985.00 चौ.फूट

कार्यालय अधिक्षक,
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(विक्रांत मोरे)

# न्यूरोथेरेपी एक नैसर्गिक थेरेपी

**डॉ.अकबर मणियार यांचे प्रतिपादन; मोफत आयुर्वेदिक न्यूरोथेरेपी शिबिरास प्रतिसाद, बुथ हॉस्पिटलचा उपक्रम**

नगर – आयुर्वेदामध्ये न्यूरोथेरपी एक महत्त्वाची थेरेपी आहे. त्यापासून कोणतेही दुष्परिणाम नाहीत. न्यूरोथेरेपी नैसर्गिक पद्धतीने कार्य करते आणि कोणत्याही औषधांचा वापर करत नाही, त्यामुळे शरीरावर कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत ही एक नैसर्गिक थेरीपी असल्याचे प्रतिपादन बुथ हॉस्पिटल येथील न्यूरोथेरेपीस्ट डॉ. अकबर मणियार यांनी केले.

निमगाव गांगर्डा (ता. कर्जत) येथे बुथ हॉस्पिटलच्या वतीने मोफत आयुर्वेदिक न्यूरोथेरेपी शिबिराचे आयोजन केले होते. याप्रसंगी डॉ. मणियार बोलत होते. यावेळी पंचायत समिती सदस्य बाबासाहेब गांगर्डे, थेरिफिस्ट आरिफ मनियार, सरपंच एकनाथ गांगर्डे, आनंदराव गांगर्डे, उपसरपंच तानाजी अनभुले, ग्रामपंचायत सदस्य शरद गांगर्डे, विठ्ठल ढगे, पांडुरंग गाडे, अनिल पांडुळे, संभाजी गांगर्डे, दत्तात्रेय ढगे, अमोल अनभुले आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. मणियार म्हणाले की विना औषधाचे उपचार करू शकतो सांधे व मणक्याशी निगडित सर्व आजारावर उपचार न्यूरोथेरेपीमध्ये करता येतात. ही थेरपी वेगवेगळ्या प्रकारच्या आजारांसाठी प्रभावी ठरते, संधिवात, मधुमेह, रक्तदाब, थकवा, तणाव, आणि मेंदूचे विकार. अशा विविध आजारांचे उपचार केले जातात ही थेरपी मज्जासंस्थेवर काम करते, ज्यामुळे स्नायूंची कार्यक्षमता सुधारते आणि वेदना कमी होते. भावनिक आणि मानसिक आरोग्य यामुळे सुधारते तणाव, चिंता, आणि डिप्रेशन यांसारख्या मानसिक आजारांवर न्यूरोथेरेपीचा सकारात्मक परिणाम होतो. न्यूरोथेरेपी संपूर्ण शरीरावर काम करते आणि शरीराच्या विविध प्रणालींचे संतुलन राखण्यात मदत करते. असे ते म्हणाले.

यावेळी उद्योजक अमोल अनभुले म्हणाले की, निमगाव गांगर्डा येथे बुथ हॉस्पिटलच्या वतीने मोफत आयुर्वेदिक न्यूरोथेरेपी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात अडीचशेच्या वर रुग्णांनी त्याचा लाभ घेतला याचा फायदा गावकऱ्यांना झाला आहे. गावागावांमध्ये अशा प्रकारचे शिबिरे झाली पाहिजे त्यासाठी सर्वांनी पुढे येण्याची गरज आहे. वैद्यकीय क्षेत्रामध्ये आयुर्वेद उपचार पद्धती हीच खरी पद्धत आहे ज्यामुळे कुठलाही परिणाम शरीरावर होत नाही साधी सरळ सोपी आणि सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारी अशी ही उपचार पद्धती असल्याचे ते म्हणाले.



निमगाव गांगर्डा येथे बुथ हॉस्पिटलच्यावतीने मोफत आयुर्वेदिक न्यूरोथेरेपी शिबिराप्रसंगी ग्रामस्थ उपस्थित होते. (छाया – समीर मन्यार)

**अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर**
महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक ता. नगर कार्यालयाशेजारी, अहमदनगर. फोन (०२४१) २३२६९१४. E-mail: ahmednagarfederation@rediffmail.com

जा.क्र. पतसंस्था फेडरेशन २२६४/सन २०२४

**स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटीस**

दिनांक ०८/०८/२०२४

नमुना 'ब्रेड' (नियम १०७ पोट-नियम (११ (ड-१) पहा.)

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी :– **ओम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगार, ता. व जिल्हा अहमदनगर** द्वारा: **अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर,** महाराष्ट्र सह. संस्था नियम १९६१ अन्वये असून, मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. खाली सही करणाऱ्याने जप्तीची नोटीस दिली असून, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१मधील नियम १०७ (११ (ड–१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार **दि. ०७/०८/२०२४** दिवशी ताबा घेतला आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास :– **ओम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगार, ता. व जिल्हा अहमदनगर** यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज याला अधीन राहावे लागेल.

**– स्थावर मालमत्तेचे वर्णन –**

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव | थकबाकी रक्कम | नोटीस दिनांक | गावाचे नाव | गट क्रमांक भूमापन क्र. | क्षेत्र हे. आर. चौ. मी. | चतु:सिमा पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार – निलेश पोपट दळवी यांची मिळकत | दावा रक्कम रु. ४५१८४७/– दि. ३०/०९/२०२२ पासून १५% व्याज + इतर खर्च | मागणी नोटीस दि. ३१/०८/२०२३ जप्ती नो. दि. २१/०६/२०२४ | सोनेवाडी, चास, ता. नगर | १० | ०.३४ | मूळ नकाशा प्रमाणे | | | |
| २ | कर्जदार – यासीन नासर अरब यांची मिळकत | दावा रक्कम रु. ३५७६०१/– दि. ३०/०९/२०२२ पासून १५% व्याज + इतर खर्च | मागणी नोटीस दि. ३१/०८/२०२३ जप्ती नो. दि. २१/०६/२०२४ | केडगाव, ता. नगर | ५१/३/ब/ प्लॉट/८/९/ १०/१ | १.०१.२५ | मूळ नकाशा प्रमाणे | | | |

दिनांक : ०८/०८/२०२४
स्थळ : अहमदनगर

(शिक्का)

(सही/–) एम. ए. शेख,
विशेष वसुली व विक्री अधिकारी,
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सह. फेडरेशन मर्या., अहमदनगर

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार अहमदनगर यांचे कार्यालय, अहमदनगर**
ई–मेल अ‍ॅड्रेस:– nagartahsildar@gmail.com
दूरध्वनी क्रमांक:– ०२४१–२४११६००
क्र. कावि/ Mag–२/३६९/२०२४ अहमदनगर दि. ०६/०८/२०२४

**जाहीर नोटीस**

श्री. विकी यशवंत कांबळे
केडगाव, ता. जि. अहमदनगर } वादी
विरूद्ध
ग्रामसेवक, निबंधक जन्म–मृत्यू
ग्रामपंचायत खंडाळा, ता. जि. अहमदनगर } प्रतिवादी

ज्याअर्थी अर्जदार यांनी सदरचा अर्ज जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा. तहसीलदार अहमदनगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार श्री. विकी यशवंत कांबळे यांचे स्वतः नामे श्री. विकी यशवंत कांबळे यांची दि. १५/०४/१९८८ रोजी जन्म झालेला आहे. त्यांचे जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसा जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी अर्जदार श्री. विकी यशवंत कांबळे यांची स्वतः नामे श्री. विकी यशवंत कांबळे यांचा जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुराव्यानिशी मा. तहसीलदार अहमदनगर यांचे कार्यालयात कळवाव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार नामे श्री. विकी यशवंत कांबळे यांचे जन्माची नोंद प्रतिवादी यांच्याकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकूम करतील. मग त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही.

येणेप्रमाणे आज दि. ०६/०८/२०२४ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

तहसीलदार अहमदनगर करिता

# दुचाकीची चोरी

नगर – बोल्हेगाव उपनगरात गणेश चौक येथे घरासमोर लावलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटारसायकल (क्रं.एम.एच.१६ डी जे ८५९३) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना रविवारी (दि.४) पहाटे घडली आहे. याबाबत अस्लम बबन पठाण (रा. गणेश चौक, बोल्हेगाव) यांनी बुधवारी (दि.७) तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ३०५ (बी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# मोपेडची चोरी

नगर – भिंगार नाल्याजवळील बेलेश्वर मंदिर परिसरात लावलेली होंडा कंपनीची मोपेड (क्रं.एम.एच.१६ डी के ९०६६) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना सोमवारी (दि.५) दुपारी घडली आहे.

याबाबत सचिन सुरेश गुरसाळे (रा. दर्गादायरा, मुकुंदनगर) यांनी बुधवारी (दि.७) भिंगार कम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ३०५ (बी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## 'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।



बंधुओ, सगळ्यात मोठी गोष्ट अशी ओ, कि मनुष्य मानव जर आपल्या जीवनात कोणत्याही प्रकारची सिद्धी मिळवण्यासाठी प्रयत्न करत असतो, तर सर्वात महत्त्वाचे असे, कि त्यांना श्रद्धावान झाले पाहिजे. श्रद्धाच्या अभावाने कधीही मनात दृढता (साहस), हिम्मत आणि संकल्प शक्ति उत्पन्न होत नाही.

मोठ्यातला मोठा विद्वान सुद्धा मनात पूर्ण श्रद्धा ठेवत नाही तर त्याच्या विद्वानताची काहीच किंमत नाही. त्यांचे हजारो शिष्याला शास्त्र व धर्मग्रन्थ शिकवून परीक्षेत पास करून देतो, म्हणजेच आपल्या जीवनाचे बहुतांश वेळ तो शास्त्र, ग्रंथ शिकवण्यात व्यतीत करत असतो, परंतु त्याच्या शिकवण्याने ते स्वतः काहीच फायदा उठवत नाही. स्वतः त्यांच्या मनात खरी श्रद्धा होत नाही आणि दिवसरात्र धर्मग्रन्थ आध्यात्मिक शास्त्र दुसऱ्यांना शिकवून सुद्धा स्वतः रिकामाच राहतो. त्याच्या ह्रगयात आध्यात्म-रसाचा झरा वाहत नाही. सम्राट अकबर तानसेनच्या संगीत आणि वाद्याचा मोठा प्रशंसक होता. म्हणून तानसेनला अकबरच्या महालात फार मोठे स्थान मिळाले होते. एक दिवस अकबरने तानसेनचा मनोमुग्धकारी गीत, ध्वनी ऐकल्यानंतर अचानक मध्येच बोलतो, ''तानसेन! तू किती सुन्दर गातो, पण मी विचार करतो कि, ज्या गुरुकडून तू गाण्याचे शिक्षण घेतले, त्यांनी तुला एवढे चांगले शिकवले तर ते गुरू किती छान गात असेल! पण? ते जर जिवंत असते तर त्यांचे सुंदर गाणं मी ऐकले असते! ह्यावर तानसेन म्हणाला, महाराज माझे गुरू जिवंत आहेत, पण ते कोणासाठी गात नाहीत, परंतु तुम्हाला त्यांचे गाणे ऐकायचे असेल तर आज रात्री आपण लपून ऐकू शकतो. ह्यावर अकबरांनी होकार दिला. गाणे ऐकल्यावर राजा मंत्रमुग्ध झाला. त्याला आपला आनंद व्यक्त करता येत नव्हता. अकबर म्हणाला, तानसेन तुझे गुरू तुझ्यापेक्षा किती छान गातात. ह्यावर तानसेन म्हणाला, राजन गुरू हे त्यांच्या आनंदासाठी गातात व मी तुमच्या आनंदासाठी गातो.

कोणत्याही क्रियेचे खरे फळ तेव्हाच मिळते, जेव्हा ते फक्त आपल्या आनंदासाठी, मनाला समाधान मिळण्यासाठी केला जातो. तेव्हा त्याच्या उद्देशाच्या फळाची अपेक्षा, पेक्षा पवित्र व दृढ संकल्पयुक्त होत आहे.

– सौ. सविता चोरडिया

# सीसीटीव्ही फुटेजच्या मागणीसाठी शल्य चिकित्सकांच्या दालनात ठिय्या

**उजेडात होते पुण्य, अंधारात पाप, दृष्ट दुर्जनांची कैसी घडे लोकसेवा, उघड दार देवा आता...**

नगर – भाजप कार्यकर्ता आणि शासनाच्या फसवणुकीतील आरोपी विजय सदाशिव औटी याला मंगळवारी रात्री जिल्हा शासकीय रुग्णालय व ड्युटीवरील पोलीस कर्मचारी यांनी संगनमत करत महाविकास आघाडीचे आंदोलन सुरू असताना रात्रीच्या अंधारात मागच्या दाराने पळवून नेले होते. या सर्व प्रकरणाबाबतच्या सीसीटीव्ही फुटेजची मागणी करण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.घोगरे यांच्या दालनात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी आघाडीच्या कार्यकर्त्यांनी उजेडात होते पुण्य, अंधारात पाप, दृष्ट दुर्जनांची कैसी घडे लोकसेवा, उघड दार देवा आता, उघड दार देवा हे भक्तीगीत गात प्रशासनाचे अक्षरशः वाभाडे काढले.

शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे, राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, युवासेना राज्य सहसचिव विक्रम राठोड, शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे, काँग्रेस ओबीसी शहर जिल्हाध्यक्ष संजय झिंजे, नगर शहर ब्लॉक काँग्रेस अध्यक्ष मनोज गुंदेचा, काँग्रेस मागासवर्गीय विभागाचे प्रदेश सचिव सुनील क्षेत्रे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे पदाधिकारी उमेश भांबरकर, चैतन्य ससे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



सीसीटीव्ही फुटेजच्या मागणीसाठी शल्य चिकित्सकांच्या दालनात ठिय्या मांडून बसले होते.

### सिव्हिल सर्जन यांचे पारनेर कारागृह अधीक्षकांना पत्र

या पत्रात सिव्हिल सर्जन यांनी म्हटले आहे की, ३ ऑगस्ट रोजी आपल्या कारागृहातील बंदी विजय सदाशिव औटी हा पारनेर ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला होता. त्याला ६ ऑगस्ट रोजी सकाळी ८.५० वा. डिस्चार्ज देण्यात आला. सकाळी ११:४५, दुपारी १२.०५ वा. पाठपुरावा करण्यात आला. पुन्हा १.०५ वा. सदर बंदिस ड्युटीवरील पोलीस कर्मचारी सचिन आनंदा जावळे, बॅच नंबर १५०९ यास हस्तांतरित करण्यात आले होते. परंतु रात्री ८.१५ पर्यंत बंदिस पारनेर कारागृह येथे स्थलांतरित करण्यात आले नाही. ही बाब गंभीर असून याबाबत आपण पुढील कार्यवाही करावी असे सिव्हिल सर्जन यांनी पत्रात म्हटले असून या पत्राची प्रत जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना देखील पाठविण्यात आली आहे.

### सीसीटीव्ही फुटेज देण्याचे लेखी आश्वासन

किरण काळे, प्रकाश पोटे यांनी सिव्हील मधील सीसीटीव्ही फुटेजची मागणी लेखी अर्जद्वारे केली होती. याबाबत स्वतः जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या सहीचे आश्वासनाचे पत्र देण्यात आले असून सदर फुटेज डाऊनलोड करण्यासाठी तांत्रिक कारणास्तव १५ ते २० तासांचा अवधी आवश्यक असल्याने ती कार्यवाही पूर्ण होताच फुटेज उपलब्ध करण्यात करून देण्यात येईल असे म्हटले आहे. लेखी आश्वासन नंतर ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.

# खा. निलेश लंके यांनी रस्त्यावर उतरत केले नगर शहरातील नागरी समस्यांचे निरीक्षण

**वाढत्या रोगराईवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी**

नगर – आहिल्यानगर मनपा हद्दीत वाढलेल्या रोगराईवर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात असे साकडे खा. निलेश लंके यांनी आयुक्त यशवंत डांगे यांना साकडे घातले आहे.



या निवेदनात म्हटले आहे की, काही दिवसांपासून सतत पडणारा पाउस तसेच पावसाचे साचलेले पाणी अस्वच्छता यामुळे अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीत रोगराई सदृश्य परीस्थिती आहे अनेक ठिकाणी अस्वस्छता तसेच पावसाच्या पाण्याने डासांचा प्रार्दुभाव वाढला आहे त्यामुळे बऱ्याच ठिकाणी नागरिक तसेच लहान मुलांना डेंगू, मलेरिया, चिकनगुनिया, टायफाइड, विषाणुजन्य संसर्ग सारख्या आजारांचा सामना करावा लागत आहे. या रोगाचा मोठ्या प्रमाणात फैलाव होण्यापूर्वी त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

नागरिकांचे आरोग्य अत्यंत महत्वाचे असून शहर व उपनगरात मनपा हद्दीत नियमित डास निर्मूलन फवारणी करावी तसेच विषाणुजन्य संसर्ग निर्मूलनासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. तरी तात्काळ योग्य त्या उपाययोजना कराव्यात तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

खा. निलेश लंके स्वतः नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रत्यक्ष मैदानात उतरले आहेत. निलेश लंके यांना नागरिकांच्या आरोग्याची विशेष काळजी असून त्यांनी महानगरपालिकेने त्वरित उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



### राष्ट्रवादी काँग्रेस युवती प्रदेशाध्यक्षपदी संध्या सोनवणे

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार गट) महाराष्ट्र प्रदेश युवती प्रदेशाध्यक्षपदी संध्या सोनवणे यांची नियुक्ती प्रदेशध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्यावतीने करण्यात आली असून नियुक्तीचे पत्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते देण्यात आले.

# एकवटलेल्या मराठा आंदोलनाला चौकट टाका अन्यथा राजकीय मंडळी 'पोळी' भाजून घेतील

**मनसे विद्यार्थी सेनेचे सुमित वर्मा यांचे मनोज जरांगे पाटील यांना खुले पत्र**

नगर – भुतो न भविष्यती अशा एकवटलेल्या समाजाचा पुन्हा हिरमोड होऊ देऊ नका. आंदोलनाला एक चौकट टाका अन्यथा राजकीय मंडळी तुमचा फायदा घेऊन राजकीय पोळी भाजून घेतील, असे खुले पत्र महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज्य उपाध्यक्ष सुमित वर्मा यांनी मनोज जरांगे पाटील यांना पाठविले आहे.

या पत्रात म्हटले आहे की, बऱ्याच मोठ्या काळानंतर मराठा समाज एक छत्र एक नेतृत्व या अजेंड्याखाली समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आंदोलनाच्या माध्यमातून एकवटला आहे याचे सर्व श्रेय तुम्हालाच जाते, पण या आंदोलनाची दिशा भरकटवण्याचा प्रयत्न काही राजकीय हस्तक करत असल्याचे गेल्या काही दिवसात दिसून येत आहे. तुम्ही हे आंदोलन सर्वसामान्य मराठा बांधवांसाठी आणि त्यांच्या सोबत सुरू केले पण याला दिवसेंदिवस राजकीय हस्तक आंदोलन हाताळताना दिसत आहे परवाच मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे धाराशिव दौऱ्यावर असताना त्या ठिकाणी अकारण घोषणाबाजी आणि निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात तुमच्या नावाखाली शिवसेना उबाठा आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाची काही टारगट टाळकी घुसली आणि आंदोलन हातात घेतले. खरंतर मराठा आरक्षणाच्या आंदोलनावेळी राज ठाकरे आपली भेट ही घेतली त्यावर वेळोवेळी भूमिका ही स्पष्ट केली पण काही मंडळी मुद्दाम या भूमिकांना वेगळा रंग आणि वेगळा अर्थ देऊ इच्छित आहेत. आमची आपणास विनंती आहे की या आरक्षण आंदोलनाला एक समितीचे स्वरूप द्यावे आणि त्यात जिल्हा निहाय राजकारण विरहित माणसं अधिकृतरित्या नेमली जावी म्हणजेच तीच मंडळी आंदोलनासंदर्भात किंवा तुमच्या बाबतीत अधिकृत भूमिका मांडतील आणि असे असताना तुमच्या आंदोलनात कोणी भरकटलेली कुत्री स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी याचा वापर करून घेणार नाही आपल्यावर कोणाच्या संशयाची नजर देखील राहणार नाही, आपण याचा विचार करावा आणि आंदोलनाला एक चौकट तयार करावी कारण भूतो न भविष्यती अश्या एकवटलेल्या समाजाचा पुन्हा फक्त राजकीय वापरच झाला तर परत भविष्यात समाज कोणाच्याही हाकेला ओ देणार नाही, असे वर्मा यांनी या पत्रात म्हटले आहे.

# ऋषभ होमिओपॅथी क्लिनिकमध्ये १२ ऑगस्टपासून उपचार शिबीर

नगर – अनेक जुने आजार समूळ बरे करण्यासाठी होमिओपॅथी उपचार पध्दती अतिशय प्रभावशाली मानली जाते. जास्तीत जास्त रूग्णांना या उपचार पध्दतीचा लाभ मिळवून देण्यासाठी माळीवाडा बसस्थानकासमोरील अंबर प्लाझा येथील ऋषभ होमिओपॅथी क्लिनिक येथे १२ ते १५ ऑगस्ट या कालावधीत सकाळी ११ ते सायंकाळी ७ यावेळेत प्रभावी होमिओपॅथी उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात औषधोपचारांवर ५० टक्के सवलत दिली जाणार आहे, अशी माहिती होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ.सचिन बोरा यांनी दिली.

दिर्घकालीन आजाराने त्रस्त, आजारावर शस्त्रक्रिया सांगितलेले रूग्ण, भरपूर औषधे घेतली तरी आजार बरा होत नसलेले रूग्ण, औषधांमुळे होणारे इतर दुष्परिणाम अशा सर्व समस्यांवर विना शस्त्रक्रिया, विना इंजेक्शन आणि रोगाचे समूळ उच्चाटन करणारे उपचार होमिओपॅथीमध्ये उपलब्ध आहेत. होमिओपॅथी उपचारांचे इतर कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत.

या शिबीरामध्ये त्वचा समस्या, केसांच्या समस्या, हाडांच्या समस्या, पोटाच्या समस्या, मानसिक समस्या, महिलांच्या समस्या, लहान मुलांच्या समस्या, पॅरालिसीस, पार्किन्सन, डायलिसीस, किडनी फेल्युअर, लिव्हर सिरोसिस, प्रोस्टेट, हर्निया, मुतखडा, मुळव्याध, मायग्रेन, थॉयराईड, अस्थमा, लर्जी, संधीवात, स्पॉन्डिलायटिस, लैगिंक समस्या इत्यादी समस्यावर प्रभावी होमिओपॅथी उपचार करण्यात येतील. या शिबीरामध्ये ज्या रुग्णाना लाभ घ्याचा आहे त्यांनी अगोदर नाव नोंदणी करावी. तसेच आपले सर्व रिपोर्टस् सोबत आणावेत. डॉ.सचिन बोरा हे मागील २० वर्षा पासून होमिओपॅथी उपचार देत आहेत.

या शिबीराचा लाभ सर्व रुग्णांनी घ्यावा. आपले आयुष्य आनंदी, वेदनाविरहीत जगावे असे डॉ. बोरा म्हणाले. माहितीसाठी संपर्क ८३७८८५०८५०

# शहर विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी मतदार यादीत आपल्या नावाची खात्री करावी

**उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांचे आवाहन**

नगर – भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्र मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रम जाहीर केल्यानुसार २२५- अहमदनगर शहर विधानसभा मतदार संघातील मतदार नोंदणी अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय तसेच संबंधित मतदान केंद्रावर प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत आहे किंवा नाही याची खात्री करण्याचे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोग जाहीर केलेल्या छायाचित्र मतदार याद्यांच्या संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रमानुसार ६ ऑगस्ट २०२४ रोजी एकत्रीकृत प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी करणे, ६ ते २० ऑगस्ट दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी, १०, ११, १७ व १८ ऑगस्ट २०२४ रोजी प्रत्येक मतदान केंद्रावर विशेष मोहिमांच्या आयोजनाचा कालावधी असून, २९ ऑगस्ट रोजी दावे व हरकती निकाली काढण्यात येणार आहेत. २९ ऑगस्ट २०२४ रोजी अंतिम प्रसिद्धीसाठी आयोगाची परवानगी मागणे तसेच डाटाबेस अद्यावत करणे आणि पुरवणी याद्यीची छपाई करण्यात येणार असून, ३० ऑगस्ट रोजी अंतिम यादीची प्रसिद्धी करण्यात येणार आहे.

१ जुलै ते १ ऑक्टोबर, २०२४ दरम्यान १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या मतदारांनी नाव नोंदणीसाठी नमुना ६ भरुन द्यावा. नाव, पत्ता बदल करणे व स्थलांतर यासाठी नमुना ८ भरुन द्यावा. मयत, दुबार, स्थलांतरीत मतदारांची नावांची वगळणी करण्यासाठी नमुना ७ भरुन द्यावा. हा नमुना भरण्याची सुविधा भारत निवडणूक आयोगाच्या https://voters.eci.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच मतदार यादीत आपले नाव तपासण्यासाठी www.ceo.maharashtra.gov.in आणि www.electoralsearch.eci.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. या शिवाय नागरीकांना व्होटर्स हेल्पलाईन मोबाईल अॅप देखील नाव नोंदणी व नाव शोधण्यासाठी उपलब्ध आहे. मतदार नोंदणीचे अर्ज जिल्हयातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय या ठिकाणी देखील उपलब्ध असुन नागरीकांना कोणतीही अडचण असल्यास मतदार मदत क्रमांक १८००२२१९५० वर संपर्क साधण्याचे आवाहनही श्री. पाटील यांनी यावेळी केले.

२२५-अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघामध्ये २८६ मतदान केंद्रे होते. यामध्ये वाढ करण्यात येऊन ११ नवीन मतदान केंद्रे प्रस्तावित करण्यात आली असुन एकुण मतदान केंद्रांची संख्या २९७ एवढी झाली आहे. २१ मतदान केंद्राच्या इमारतीमध्ये बदल करण्याचे प्रस्तावित असुन ९ मतदान केंद्राच्या नावात बदल करणे प्रस्तावित करण्यात आले असल्याची माहितीही श्री. पाटील यांनी दिली आहे.

# विळद परिसरात पर्यटकाला लुटणारी टोळी केली जेरबंद

**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; आरोपी निघाले रेकॉर्डवरील गुन्हेगार**

नगर – नगर तालुक्यातील विळद परिसरात असलेल्या गवळीवाडा वॉटर फॉल येथे फिरण्यासाठी गेलेल्या वैभव उत्तम सहजराव (वय २१, रा. जांब, जिल्हा परभणी, हल्ली रा. पंचवटी नगर, भिस्तबाग चौक, सावेडी) यास मारहाण करून लुटणारी ५ जणांची टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडली आहे. हे आरोपी रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे समोर आले आहे.

सुरेश रणजीत निकम (वय ३०), विलास संजय बर्डे (वय २२), रोहित संदीप शिंदे (वय १९, सर्व रा. कात्रड, ता. राहुरी), ज्ञानेश्वर भानुदास बर्डे (वय २१, मुळ रा. कोंढवड, ता. राहुरी व हल्ली रा. बोल्हेगांव, ता. नगर) व शांताराम भानुदास काळकुंड (वय १९, रा. दत्त मंदीरा शेजारी, निंबळक, ता. नगर) असे पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. या ५ जणांनी शनिवारी (दि.३) दुपारी वैभव यास मारहाण करुन मोबाईल फोन, चांदीची चैन, अंगठी व रोख रक्कम लुटली होती. याबाबत मंगळवारी (दि.६) एमआयडीसी पोलिस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल झाला होता.



विळद परिसरात पर्यटकाला लुटणारी टोळी केली जेरबंद केल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

या गुन्ह्याच्या समांतर तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांनी स.पो.नि.हेमंत थोरात, पो.हे.कॉ. गणेश भिंगारदे, संतोष लोढे, अतुल लोटके, देवेंद्र शेलार, पो.ना.फुरकान शेख, पो.कॉ. रविंद्र घुगांसे, आकाश काळे, मयुर गायकवाड, किशोर शिरसाठ, रोहित येमुल, प्रमोद जाधव, प्रशांत राठोड, चालक पो.हे.कॉ. चंद्रकांत कुसळकर व अरुण मोरे यांचे पथक नेमले होते. सदर पथक तांत्रिक विश्लेषणाचे आधारे व गुप्तबातमीदारा मार्फत एमआयडीसी, बेल्हेगांव, विळद व राहुरी परिसरातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती घेत असतांना पो.नि. आहेर यांना सदर गुन्हा हा सुरेश रणजीत निकम व विलास बर्डे यांनी त्यांचे इतर ३ साथीदारांसह केला असुन ते कात्रड गांवातील स्मशानभुमी जवळ बसलेले आहेत.अशी खात्रीशीर माहिती मिळाली. पो.नि.आहेर यांनी तत्काळ सदर पथक कारवाई साठी पाठविले.

या पथकाने कात्रड गांवातील स्मशानभुमी जवळ एका झाडा खाली गप्पा मारत बसलेल्या या ५ आरोपींना पकडले. त्यांचेकडे विचारपुस करता सुरुवातीस ते उडवाउडवीची उत्तरे देवु लागले. मात्र त्यांची कसून चौकशी केल्यावर त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. या आरोपींना पुढील कार्यवाहीसाठी एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



अहमदनगर जिल्हा वाचनालयाचे ग्रंथपाल अमोल इथापे यांना डॉ. एस.आर रंगनाथन उत्कृष्ट सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना किशोर गांधी.

# ग्रंथालयरूपी ज्ञान मंदिरे समाज घडवतात

### किशोर गांधी यांचे प्रतिपादन

नगर – चौफेर वाचनामुळे व्यकीची बौद्धिक क्षमता वृद्धिंगत होते. त्यामुळे समाजाची खरी प्रगती साधायची झाल्यास ग्रंथालयरूपी ज्ञान मंदिरे जागोजागी उभी होणे आवश्यक आहे. अशा ग्रंथालयांना शासनासह नागरिकांनी सहकार्य केले पाहिजे, असे प्रतिपादन किशोर गांधी यांनी केले.

अहमदनगर जिल्हा वाचनालयाचे ग्रंथपाल अमोल इथापे यांना नाशिक विभागीत डॉ. एस.आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार जाहीर झाला आहे. यानिमित्त इथापे यांच्या सत्कार प्रसंगी किशोर गांधी बोलत होते.

यावेळी अभय ललवाणी, प्रा. दिनेश खांदवे, राजेंद्र शिंदे, प्रमोद गांधी, वर्षा जोशी, निखिल ढाकणे, उल्हास नांगरे, पल्लवी कुक्कुडवाल, माधवी गोरे, संजय गाडेकर आदी उपस्थित होते.

अमोल इथापे हे गेल्या अनेक वर्षांपासून नगर जिल्हा वाचनालयाचे काम अतिशय तन्मयतेने पाहत आहेत. त्यांच्या आधी संजय लिहिणे यांनी ग्रंथपाल म्हणून वाचन चळवळीत मोठे योगदान दिले. अहमदनगर जिल्हा वाचनालय ब्रिटीशांनी स्थापन केलेले राज्यातील सर्वात जुने आणि मोठे सार्वजनिक वाचनालय आहे. विपुल ग्रंथसंपदा असल्याने याठिकाणी हजारो वाचक, साहित्यिक, रसिक ज्ञानसाधना करीत असतात. आम्हीही गेल्या २५ वर्षांपासून या ठिकाणी ज्ञानसाधना करीत आहोत, असे किशोर गांधी यांनी सांगितले.

जिल्हा वाचनालयाची दुसरी अतिशय सुसज्ज शाखा सावेडी उपनगरात सुरू झाली आहे. याबद्दल वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. शिरिष मोडक यांच्यासहित सर्व संचालक आणि कर्मचाऱ्यांचे वाचकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

ग्रंथपाल अमोल इथापे यांनी या सत्काराबद्दल सर्व वाचकांप्रती कृतज्ञता व्यक्त करीत महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच नगरकरांनी वाचनालयाचे सभासद होण्याचं आवाहन केले.

# महाराष्ट्र राज्य संघ निवड स्पर्धेत 'फ्रीस्टाइल' मध्ये चेतन रेपाळेची प्रथम क्रमांकाने निवड

नगर – पारनेर तालुक्यातील पै. चेतन रेपाळे याची २३ वर्षांखालील महाराष्ट्र राज्य संघ निवड स्पर्धेत फ्रीस्टाइल ९७ किलो वजन गटात प्रथम क्रमांकाने निवड करण्यात आली असून हरियाणा येथे १५ ते १८ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत ९७ किलो वजन गटात महाराष्ट्राचे नेतृत्व करणार आहे.



या निवडीबद्दल अहमदनगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आ. संग्राम जगताप, उपाध्यक्ष महाराष्ट्र केसरी पै. शिवाजी शिर्के, पै. अर्जुन (देवा) शेळके, पै. शिवाजी चव्हाण, उप महाराष्ट्र केसरी बबन काशीद, महाराष्ट्र केसरी पै. गुलाब बर्डे, उप महाराष्ट्र केसरी बापू थिटे, सचिव प्रा. डॉ. पै. संतोष भुजबळ, पै. पांडुरंग गुंजाळ, पै. मधुकर उचाळे, पै. रवींद्र वाघ, सह सचिव पै. प्रवीण घुले, पै. शिवाजी कराळे, उत्तर महाराष्ट्र केसरी पै. युवराज करंजुले, पै. उमेश भागानगरे, पै. नितीन काकडे, पै. शंकर खोसे, पै. प्रमोद गोडसे, पै. संदिप कावरे, पै. धनंजय खर्से, पै. अफजल शेख, पै. अतुल कावळे, पै. मोहन गुंजाळ तसेच सर्व पदाधिकारी यांच्या वतीने अभिनंदन व पुढील राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

